यापैकी कोणते प्रशिक्षणार्थी समोर आहेत, हे समजून घ्यावे. वेगवेगळ्या विचारांचे, वैशिष्ट्यांचे प्रशिक्षणार्थी एकत्र आलेले असले, तरी त्यात नवल मानू नये. एकाच वर्गात सारेच प्रशिक्षणार्थी सारख्याच विचारांचे असतील, असे गृहीत धरता कामा नये.

प्रशिक्षक म्हणून आपण आपल्या कामाचे अशा पद्धतीने नियोजन करायला हवे की त्यातून आपल्याही शिकण्याच्या पद्धती समोर यायला हव्यात. अर्थात, हे नेहमीच योग्य असेल, असे नाही. नियोजन करताना शिकवण्याच्या वेगवेगळ्या पद्धती लक्षात घ्या. प्रशिक्षण सुरू करतानाच आपल्या समोरील प्रशिक्षणार्थींची वैशिष्ट्ये अगदीच परस्परभिन्न आहेत, तरी त्यांच्याशी जुळवून घेत नव्या पद्धतींचा विचार करा. पुढच्या विभागातील प्रशिक्षण पद्धतींचा वापर करताना तुमच्याकडे काय काय साधने आहेत, त्यांचा जास्तीत जास्त वापर करा.


Training components are not
designed to make the trainer happy.
It’s about the participants.


प्रशिक्षकाला खूष करण्यासाठी प्रशिक्षणाचे घटक विकसित केलेले नाहीत.
हे सहभागींसाठी आहे.

# 2.2 The participatory approach

## 2.2.1 Participation

To 'participate' means to join in, to take part, to involve oneself with. 'Participation' in social and educational science is an umbrella term. It has often to do with involving people in projects, policy reviews or ideas to encourage decision making and self-empowerment.

A participatory approach to group events such as training courses and workshops aims at motivating the group members to play an active role in the learning process.

Active participants get more enjoyment out of the training. They learn more, and for them the outcome is much more sustainable. There are six principles involved in achieving effective participation:

1. self-regulation (rather than demanding discipline from participants only)
2. participation and cooperation (allow participants to contribute)
3. challenge orientation (rather than provide run-of-the-mill solutions)
4. dynamic visualization[1] (as an alternative to static visualization)
5. facilitation (rather than top-down teaching)
6. continuous evaluation (as opposed to end-of-the-course feedback only).

**Essentially, the participatory approach is much more than just a 'technique.' People who believe in enabling participants to become active and responsible take them more seriously and help them find sustainable solutions.**

The first step is to engage the attention of the participants. This is followed by stimulating interaction within the group. Ideally, a trainer provides a setting, atmosphere and learning process, which lead the participants to establish small working groups, discuss with each other, interact, evaluate, improve and finally try out solutions. Then they come back to the larger group, where they re-evaluate solutions. Reflection on the results can help participants integrate the new information gained from the group work and leads to ownership of the knowledge generated. This process is not only effective for the training context but can be used in any democratic decision-making process.

Thus, participatory trainers subscribe to humanistic values and democratic ideas. Encouraging participants to express themselves in a structured way (for example, using dynamic visualization techniques) and to elucidate what they mean and/or want often helps overcome centralistic ideas where only the one in power decides 'what is best for all.' In a totalitarian state, children

1 Dynamic visualization encourages participants to express verbally on the subject at hand, thus shifting the positions of 'knower' and 'listener'.

# 2.2 सहभागाकडे कसे बघायचे?

## 2.2.1 सहभाग

'सहभाग' याचा अर्थ एकत्र येणे. त्यात गुंतून जाणे. सामाजिक तसेच शैक्षणिक उपक्रमांत ही संज्ञा विस्तृत परिभाषेत वापरली जाते. एखाद्या प्रकल्पात लोकांना सहभागी करून घेणे, असा त्याचा अर्थ असतो. स्वत:ला सक्षम बनवण्याबरोबरच धोरणाचा आढावा घेणे, प्रत्यक्ष निर्णय घेणे अशा अर्थाने या संज्ञेचा विचार करायला हवा.

प्रशिक्षण तसेच कृतिसत्र यामध्ये सहभागी कार्यक्रम राबवताना गटाच्या सदस्यांना त्यामध्ये आणि विशेषत: शिक्षणाच्या प्रक्रियेत कृतिशील सहभाग असावा, असे अपेक्षित असते.

प्रशिक्षण त्यामुळे अधिक आनंददायी होऊन जाते. ते अधिकाधिक शिकत तर जातातच; शिवाय अशा प्रक्रियेतून ग्रहण केलेले ज्ञान हे अधिकाधिक निरंतर स्वरूपाचे असते. प्रभावी सहभागाची सहा तत्त्वे आहेत.

1. सहभागी व्यक्तींवर शिस्त लादण्यापेक्षा स्वत:हून काही नियम पाळणे.
2. सहभाग आणि सहकार्य. म्हणजेच सहकाऱ्यांची मते सांगण्यास परवानगी देणे.
3. प्रशिक्षकानेच प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देण्याऐवजी सहभागींना विचार करावयास लावणे.
4. पारंपरिक दृश्यांऐवजी नवनवीन आणि चैतन्यशील दृश्ये.[1]
5. फक्त उपदेशाऐवजी समन्वय.
6. सत्र संपल्यावर मूल्यांकन करण्याऐवजी सतत चर्चा करणे.

**सहभागी प्रशिक्षण पद्धती म्हणजे निव्वळ तंत्र नव्हे. ज्यांना प्रशिक्षणार्थींच्या क्षमतांवर विश्वास असतो, त्यात वाढ व्हावी असे वाटत असते असे लोकच यांचा गांभीर्याने विचार करतात आणि त्यात भर घालत असतात.**

पहिली पायरी ही अर्थातच प्रशिक्षणार्थींचे लक्ष केंद्रित करण्यासाठी आहे. त्यानंतर गटांतील संवादाचा भाग येतो. प्रशिक्षकांनी खरे तर प्रशिक्षणार्थींनी स्वत:चे उपगट निर्माण करावेत आणि यासाठी योग्य ते वातावरण तयार करायला हवे. या उपगटांमध्ये आपापसात चर्चा व्हावी, एकमेकांशी संवाद साधला जावा, अशी अपेक्षा हवी. त्यातून प्रशिक्षणाचे मूल्यांकन तर होत जाईलच; शिवाय त्यात सुधारणाही होत जाईल, तसेच समस्यांची उत्तरे स्वत: शोधण्याची सवयही लागेल. त्यानंतर प्रशिक्षणार्थी मोठ्या गटात येतील तिथे त्यांना आपण सुचवलेल्या उत्तरांचे मूल्यांकन करता येईल.

त्यामुळे लोकशाही संकल्पना तसेच मानवी मूल्ये हे विचार सहभागी प्रशिक्षणातून रुजवले जाण्यास मदत होते. शिस्तबद्ध पद्धतीने सहभागी प्रशिक्षणार्थींना आपले विचार प्रगट करण्यास प्रोत्साहित केले जात असल्यामुळे केंद्रीभूत पद्धतीने एकाचाच

---

1 ज्यांना आशयाचे चित्र उभे करता येते, प्रशिक्षणार्थींना व्यक्त होण्यास जे प्रोत्साहन देतात, असेच प्रशिक्षक त्यांच्यसाठी निव्वळ माहिती देणारी कोणी ज्ञानी व्यक्ती न राहता, प्रशिक्षणार्थींचे ऐकून घेणारी श्रोता होते.

## 2.2.2 The learning atmosphere

Sometimes participants may enter a training course with trepidation or anxiety. It is our responsibility as a trainer to create an atmosphere in which everybody feels welcome, relaxed, accepted and respected. Start out by sharing some information about yourself and invite your participants to do the same. This should also address the expectations each participant has of the training activity at hand.

This 'breaking the ice' is a key aspect of creating an environment that is conducive to learning. Getting clarity and agreement on basic ground rules (allowing people to speak without interruption, punctuality, etc.) is also essential at the outset. See the section on icebreakers in this Guide (Section 2) to get ideas on some interesting and useful icebreakers.

Clear, feasible and relevant learning objectives help give the participants a clear overview of how the training will unfold and help them see how the training may help them in the days' activity as well as in their lives outside the training program. Techniques such as small group work help bring voices and ideas to the forefront without singling out individuals, particularly those who might be shy to voice their opinions.

By making sure that your training is well planned, with activities sequenced from very easy to most difficult, you will help your learners feel confident in each session as the training progresses.

Finally, with variety being the spice of life, you can accommodate different learning styles by using a mixed bag of activities, techniques and methodologies. These will be explored in greater depth subsequently in this handbook.

(in schools) and adults (in public) are not encouraged to think critically. With participatory methods, it is possible to initiate efficient and effective bottom-up processes. When people get a chance for real participation, they are ready to take real responsibility.

Experience has shown that participatory approaches can unify even the most heterogeneous groups: men and women, old and young, participants from different regions or countries. If participation reaches 'the heart and the head,' people are able to decentralize—i.e., to include those on the fringes in the broader framework.

Ideas do not travel from mind to mind—i.e., they cannot be downloaded as from a USB stick, they must be actively shared. People have ideas. One person may have more ideas than others. In fact, the world is full of ideas. Since they do not simply travel 'from mind to mind,' this process may have to be facilitated.

A good trainer is a facilitator on a joint learning journey. The task is not primarily to impart facts to the audience but rather to make people's ideas visible and comprehensible. You may ask the plenary group to work first in smaller subgroups and to present their results, you may be surprised to find that the small groups come up with smart answers and solutions themselves; you don't have to 'teach' them. Of course, you may supplement their ideas with specific additional information, as appropriate, such as new regulations, and finally provide a handout with a summary of your topic. But the art of facilitation is to involve everybody, to identify and enable the sharing of the knowledge in the room. Participation is not always easy to achieve—however, the results of participatory processes are better in quality and more sustainable when applied in the field.

## 2.2.2 शिकण्यासाठी वातावरणनिर्मिती

कधीकधी सहभागी व्यक्ती काहीशा चिंतातूर वा काळजीच्या अवस्थेतच प्रशिक्षणासाठी येतात. एक प्रशिक्षक म्हणून त्यांचे स्वागत करणे आणि त्यांचा सन्मान राखून त्यांना मोकळे होण्यास मदत करणे ही आपली जबाबदारी असते. आपल्या स्वत:ची काही वैयक्तिक माहिती देऊन तुम्ही सुरुवात करू शकता आणि नंतर त्यांनाही तसेच करायला सांगा. त्याचवेळी या प्रशिक्षण वर्गाकडून त्यांच्या काय अपेक्षा आहेत, तेही त्यांना स्पष्ट करायला सांगावे.

अशा रीतीने एकदा वातावरण मोकळे झाले की प्रशिक्षणास योग्य ते वातावरण आपोआपच निर्माण होते. नेमके काय हवे आहे, ते स्पष्ट करणे आणि सहमती हे या संदर्भातील प्राथमिक नियम आहेत. त्याचवेळी वक्तशीरपणा तसेच कोणालाही विना अडथळे बोलू देणे, हेही बघावे लागते. या संदर्भात वातावरण मोकळे कसे करावे त्याचा तपशील याच मार्गदर्शिकेत विभाग 2 मध्ये आहे, तो जरूर बघावा.

नेमके आणि स्पष्ट आणि सहजसाध्य अशी प्रशिक्षणाची उद्दिष्टे असली की या वर्गातून आपल्या हाती नेमके काय लागणार आहे आणि वर्गातून बाहेर पडल्यावर त्याचा कितपत तसेच कसा उपयोग आपल्याला करता येईल, त्याचा ढोबळ आढावा प्रशिक्षणार्थींना घेता येतो. छोट्या गटांतून काम करायला मिळाल्यावर कोणाच्याही मनात आणि विशेषत: बुजऱ्या प्रशिक्षणार्थींना आपल्याला दूर ठेवले आहे, अशी भावना होऊ शकत नाही; कारण अशा छोट्या गटात सर्वांनाच आपल्या कल्पना सादर करायची संधी असते.

सोप्याकडून सुरुवात करून अवघड मुद्द्यांकडे जाण्याचे नियोजन केलेले असले की आपण प्रशिक्षणार्थींच्या मनातील आत्मविश्वास हा प्रशिक्षणाच्या प्रत्येक सत्रागणिक वाढवू शकतो.

'आवाज' ऐकावा लागण्याऐवजी 'सर्वांसाठी सर्वोत्तम' काय तेही या सहभागातून पुढे येते. हुकुमशाही पद्धतीत शाळेत जाणारी मुले वा समाजात वावरणारे प्रौढ यांना टीकात्मक वा विश्लेषणात्मक भूमिकेतून विचार करायला शिकवलेच जात नाही. त्याउलट प्रक्रिया ही सहभागी प्रशिक्षण पद्धतीत घडत जाते. लोकांना जेव्हा खऱ्या अर्थाने सहभागाची संधी मिळते, तेव्हाच ते खऱ्या अर्थाने जबाबदारी स्वीकारायला तयार होतात.

अनुभवांती असे दिसून आले आहे की सहभागी पद्धतीतून पुरुष आणि महिला, तरुण आणि ज्येष्ठ तसेच वेगवेगळ्या विभागांतील वा देशांती भिन्न भिन्न स्वरूपाचे गटही एक होऊन एकदिलाने काम करू शकतात. सहभाग हा एकाच वेळी बुद्धी आणि भावना या दोहोंना हाक घालू शकला तर लोक विकेंद्रीभूत पद्धतीने काम करू शकतात आणि वेगळ्या विचारांच्या सीमारेषेवर असलेल्यांनाही सहभागी करून घेऊ शकतात.

कोणतीही कल्पना एकाच्या मनातून दुसऱ्याच्या मनात थेट प्रवेश करू शकत नाही. त्यासाठी कोणताही युएसबी पेनड्राईव्ह उपलब्ध नाही! त्या कल्पना वा संकल्पना त्यासाठी दुसऱ्याबरोबर 'शेअर'च करायला लागतात. इतरांच्याही मनात काही कल्पना असू शकतात. खरे तर सारे जग हेच नवनव्या कल्पनांनी भरून गेलेले असते. फक्त एकाच्या मनातील कल्पना दुसऱ्याच्या मनापर्यंत सहजगत्या प्रवास करू शकत नसल्यामुळे ती प्रक्रिया सुरू करून द्यावी लागते.

उत्तम प्रशिक्षक हा शिकण्याच्या संयुक्त प्रवासातील समन्वयक असतो. हे काम काही केवळ माहिती इकडून तिकडे पाठवण्याचे नसते, तर लोकांच्या कल्पनांना मूर्त स्वरूप देणे आणि त्यांना समजून घेण्याचे असते. तुम्ही प्रथम मोठ्या गटाचे छोटे छोटे उपगट करून त्यांना काम करायला सांगावे आणि त्यांचे निष्कर्ष समजावून घ्यावेत. मग तुम्हाला त्यांना 'शिकवावे' लागणारच नाही. तुमचे काम फक्त त्यांच्या कल्पनांना पाठिंबा देऊन, त्यात अधिक माहितीची भर घालून त्या पुढे नेणे इतकेच राहील. नंतर मग तुम्हाला त्यांना नव्या नियमावलींची कल्पना देऊन, अखेरीस आपल्या विषयाचा तपशील स्पष्ट करणाऱ्या नोंदी देणे इतकेच राहील. सहभाग हा नेहमीच सहजसाध्य असतो, असे नाही; पण अखेरीस तळाच्या पातळीवर काम करताना त्याचे यश हे स्पष्ट होते, हे नक्की. विविधता हे रसरशीत जीवनाचे अंग आहे. त्यामुळे वेगवेगळ्या प्रशिक्षण पद्धती, विविधांगी तंत्रे आणि आराखडे वापरून आपण प्रशिक्षण एकसुरी होणार आहे, असे बघू शकतो. याच मार्गदर्शिकेत पुढे याचा अधिक तपशीलाने विचार केला आहे.

## 2.2.3 Didactic principles for taking an effective participatory approach[1]

### 1. Ownership and self-organization/self-control

The responsibility for the learning progression of an adult lies not with the trainer, lecturer or training institution but with the individual learner itself. Ownership requires transparency and the development of individual goals for the learning process.

### 2. Learning guidance

Reflecting on one's competence profile, requires the assistance of experienced trainers, facilitators or coaches who can help design the learning environment, speed, contents, etc.

### 3. Diversity of perspectives

For learning we need a comparison with other (world) views. Experiencing difference, changing perspectives, embracing new perceptions and even paradigms–all of these contribute to the learning process.

### 4. Mind-sets as a core issue

It is not only about skills but the underlying attitudes. Soft skills are often as important as, or even more important than, knowledge and facts: knowing one's own strengths and weaknesses is an important starting point for developing new competencies.

### 5. Room to experience and experiment

Real competencies cannot be simply taught in a mechanized fashion. They develop over time and with experience; a relaxed environment must therefore be created where this can happen.

### 6. Reflection

Complex developments require a critical consideration of impacts, progress and regression. Learning requires us to sometimes stop, reframe and reflect before we collate and move on.

### 7. Learning as co-construction

When people engage in real dialogue, exchanges, joint searches and deeper discussions, they build something new together.

1 Krewer and Merkle (2011).



## 2.2.3 प्रभावशाली सहभागी सत्रातील समुपदेशनाची तत्त्वे[2]

### 1. स्वनियंत्रण वा स्वत:ची हुकुमत

शिकण्याच्या प्रगतीची जबाबदारी ही प्रशिक्षक वा शिक्षक वा प्रशिक्षण देणाऱ्या संस्था यांची नसून ती प्रत्यक्ष प्रशिक्षणार्थींची व्यक्तिश: असते. हे आपले प्रशिक्षण आहे वा आपली वैयक्तिक ध्येये काय आहेत, ते लक्षात आल्यावरच प्रशिक्षणार्थींना ते आपले स्वत:चे प्रशिक्षण वाटू शकेल.

### 2. शिकण्यातील मार्गदर्शन

प्रत्येकाच्या ग्रहणशक्तीनुसार त्याला अनुभवी प्रशिक्षकांकडून वेगवेगळ्या स्वरूपाचे मार्गदर्शन मिळायला हवे, हे गृहीत धरून प्रशिक्षक वा समन्वयक वा शिक्षक यांनी शिकण्यासाठी योग्य त्या वातावरणाचे आडाखे बांधून तसे वातावरण, प्रशिक्षणाची गती निश्चित करायला हवी.

### 3. दृष्टिकोनातील विविधता

शिकण्यासाठी आपल्याकडे वेगवगळ्या जागतिक स्तरांमधील तुलना जरूरीची असते. प्रशिक्षणार्थींमधील फरक लक्षात घेऊन आपण आपल्या भूमिका, तसेच दृष्टिकोन आदींमध्ये बदल करावा लागतो. शिक्षण प्रक्रियेची मूल्ये त्यामुळेच वाढू शकतात.

### 4. प्रशिक्षणार्थींची मनोभूमिका

हा काही केवळ कौशल्यांचा विचार करण्याचा भाग नसतो, तर प्रशिक्षणार्थींची प्रवृत्ती काय आहे, हेही लक्षात घ्यावे लागते. प्रशिक्षणार्थींची क्षमता वाढवण्यासाठी त्यांची प्राथमिक कौशल्ये ज्ञान आणि माहिती यापेक्षा महत्त्वाची असतातच; पण त्याचबरोबर प्रत्येकाचे गुणदोषही लक्षात घ्यावे लागतात.

### 5. अनुभव आणि प्रयोग

केवळ यंत्रबद्ध वा चाकोरीबद्ध पद्धतीतून खऱ्या क्षमता वाढत नाहीत. अनुभव आणि काळ यातूनच त्या वाढत जातात. हे होण्यासाठी सत्रातील वातावरण अधिकाधिक मोकळे असायला हवे.

### 6. प्रतिबिंब

प्रगती ही गुंतागुंतीचीच असते. त्यासाठी नेमका प्रभाव किती पडत आहे याची कठोर चिकित्सा व्हायला हवी. शिकताना कधी कधी मध्येच थांबून आपण नेमके काय शिकलो, याचा विचार करून, त्यात बदल करून पुढे जावे लागते.

### 7. शिक्षण म्हणजे सह-रचना

लोक जेव्हा खऱ्या अर्थाने एकमेकांशी संवाद सुरू करतात, विचारांचे आदानप्रदान सुरू करतात, संयुक्तपणे काही नवे काम हाती घेतात, सखोल चर्चा करू लागतात, तेव्हाच ते एकत्रितपणे संघभावनेने नवी रचना करत असतात.

---

2 क्रीयर अ‍ॅण्ड मर्केल (2011)

# 2.3 Formulating learning outcomes of the course/ sessions

## 2.3.1 What are learning outcomes?

Learning outcomes are the changes that the course is expected to bring about in the knowledge, skills and attitude of the participants.

## 2.3.2 Whose learning outcomes?

A key feature of the participatory approach of training methods is that the responsibility of the achievement of learning outcomes rests jointly on the participant and the trainer. This joint responsibility helps shape the way the training is implemented so as to allow participants to express their views and opinions and provide feedback and allow the trainer to adapt the flow of the course.

## 2.3.3 Why learning outcomes?

Learning outcomes are a guiding light for the participants as well as for the trainer, in terms of both content and training methods, and influence the overall conduct of the course:

1. **Learning outcomes facilitate content and training methods to be used for specific sessions.**

   If a learning outcome is the participants becoming able to ‘outline concepts and issues related to managing waste in coastal cities,’ then the content will be an overview of the basics of waste management, policies and issues in this area and some good practices.

   But if the learning outcome is the participants becoming able to ‘outline concepts and issues related to managing waste in coastal cities and demonstrate the importance of media reporting for sustainable waste management in coastal cities,’ then the content will be more elaborate than in the previous situation, and the participants will be provided with more hands-on exercises such as role plays, simulation and small work assignments where they can demonstrate that media reports on waste issues can bring about a positive change.

   If the learning outcome is a step further, i.e., ‘the participants are able to use and organize the scientific information available from different sources for developing media products and to integrate the importance of sustainable waste management into mainstream issues,’ then the participants must be

# 2.3 सत्रातील शिकवण्याच्या फलितांची मोजमापे

## 2.3.1 शिकवण्यातून काय मिळवले?

सहभागी प्रशिक्षणार्थींची कौशल्ये, त्यांचे ज्ञान आणि प्रवृत्ती यात आपण जे काही बदल घडवून आणू, तेच शिकवणयाचे वा शिकण्याचे फलित होय.

## 2.3.2 कोणाच्या शिकण्याचे फलित

सहभागी प्रशिक्षणाचे खरे महत्त्व हे त्यातील शिकण्याच्या फलिताची जबाबदारी ही केवळ प्रशिक्षणार्थींच असत नाही तर ती प्रशिक्षणार्थी आणि प्रशिक्षक या दोहोंचीही असते. संयुक्त जबाबदारीच्या या तत्त्वामुळे सहभागी प्रशिक्षणार्थींना आपली मते व्यक्त करण्याची संधी मिळतेच आणि त्यातूनच मिळत जाणाऱ्या प्रतिसादातून प्रशिक्षणाचा कल लक्षात येण्यास वा त्याची गती कायम राखण्यास मदत होते.

## 2.3.3 शिकण्याच्या फलिताची गरज का?

शिकण्याचे फलित हे सहभागी प्रशिक्षणार्थी तसेच प्रशिक्षक यांच्यासाठी प्रशिक्षणाचा आशय तसेच प्रशिक्षणाच्या पद्धती या दोहोंसाठी पथदीपाप्रमाणे मार्गदर्शक ठरणारे असते.

1. **शिकण्याच्या फलितांचा सत्रात वापरण्यात येणाऱ्या पद्धती तसेच आशय यांच्यातील समन्वय**

   एखाद्या सत्रातून सहभागी प्रशिक्षणार्थी 'किनारपट्टीवरील शहरांमधील कचऱ्याच्या निर्मूलनासंदर्भात काही संकल्पना तयार करू शकले' तर त्या सत्राचा आशय हा एकूणातच कचरा व्यवस्थापन, त्याबाबतचे प्रश्न आणि धोरण यासंदर्भातील सर्वसाधारण स्वरूपाचा आढावा घेणारे ठरू शकते.

   पण प्रशिक्षणार्थींच्या सहभागातून किनारी भागातील शहरांमधील कचरा व्यवस्थापनासंदर्भात निरंतर उपाययोजनांबाबत काही ठोस निष्कर्ष बाहेर आले आणि शिवाय त्यांनी त्यात प्रसारमाध्यमांच्या वार्तांकनाचे महत्त्वही अधोरेखित केले तर तर तो आशय आधीच्या गटापेक्षा अधिक तपशीलवार स्वरूपाचा ठरू शकेल. शिवाय, त्यातून सहभागींना 'रोल प्ले'सारख्या आणखी काही वेगवेगळ्या पद्धतीही सहजपणे शिकवता येऊ शकतील. त्यातून त्यांना या उपाययोजनांमधून सकारार्थी बदल कसे घडवून आणता येतील, यासंदर्भात वार्तांकनाचे कामही देता येईल.

   शिकण्यातील फलित जर यापुढच्या पायरीवर घेऊन जाणारे असेल, उदा.: 'सहभागी प्रशिक्षणार्थी वेगवेगळ्या स्त्रोतातून उपलब्ध असलेल्या या संदर्भातील शास्त्रीय माहितीचा वापर प्रसारमाध्यमातील वृत्तांकनासाठी करत असतील, तर या प्रशिक्षणार्थींना फिल्म, ब्लॉग वा वृत्तपत्रीय लेख यासाठीही प्रवृत्त करता येईल. ज्यामुळे ते अधिक सखोल विचार वा संशोधनाच्या दिशेने जाऊ शकतात. पुढे

also facilitated to work on special media products, such as films, blogs or news articles, where they research and analyse the issue of waste management, conduct fieldwork and make the media product on the basis of their findings, which will be peer reviewed by a mixed group of experts with waste management and media backgrounds.

1. **Thinking through learning outcomes helps more efficient planning of the time required for each module/course.** For example, if the learning outcomes are only in the domain of understanding of the issues, then a shorter duration will be sufficient for the course, but if the learning outcome is the participants acquiring skills to develop media products, then a longer duration will become necessary.

2. **Learning outcomes also guide the feedback and evaluation criteria** and therefore help the course to be more effectively adapted.

## 2.3.4 How are learning outcomes formulated?

The effectiveness of the learning outcomes depends on how smartly these are formulated. SMART learning outcomes are:

- *Specific*—be as clear as possible (not vague)
- *Measurable*—this makes it easier to know if the objectives have been achieved.
- *Achievable*—be realistic in their expectations (A higher learning outcome needs more time investment from the trainer as well as participants. So if there is less time, the learning outcome must also be toned down accordingly.)
- *Relevant*—related to the overall topic, theme and target group.
- *Timebound*—have a clear time line.

**Each course and each module can have two to five learning outcomes that address different dimensions of the individual competencies (e.g., knowledge, skills and attitudes).**

- Learning outcomes, ideally, should be developed through a participatory process with representatives of the management (to get inputs about the overall purpose and direction of the course), the course director, faculty members, the trainer and a selected set of the potential participants to ensure that the learning outcomes are fully accepted by everyone. The method of developing baseline expectations is detailed in the next section. It is a good practice to evaluate the learning outcomes of the overall course as well as of each module at the end of each module/course.

- Module/ session-specific learning outcomes help answer these question:
  - What should participants know by the end of the session/s? = KNOWLEDGE SESSION
  - What should participants be able to do by the end of the session/s? = SKILL SESSION
  - What should participants be able to demonstrate by the end of the session/s? = ATTITUDE SESSION

त्यांच्या या रचना शास्त्रज्ञ वा कचरा व्यवस्थापनातील तसेच प्रसारमाध्यमातील तज्ज्ञ यांनाही अभिप्रायासाठी दाखवता येतील.

1. **शिकण्यातील फलिताचा विचार केल्यास प्रत्येक सत्रास वा मॉड्युलला नेमका किती वेळ द्यायचा याचे अधिक सक्षम नियोजन करण्यास उपयोगी पडतो. उदा.:** शिकण्याचे फलित हे फक्त प्रश्न समजून घेण्यापुरतेच मर्यादित असेल तर तर छोटी सत्रे त्यासाठी पुरेशी ठरतील. पण जर प्रशिक्षणार्थींना त्यातून पुढे प्रसारमाध्यमांसाठी काही काम करायला द्यायचे असेल तर तर त्यासाठी सत्रांचा कालावधी हा मोठा असावा लागतो.

2. शिक्षणाचे फलित सामोरे आल्यास मूल्यांकनासाठी त्याचा फार मोलाचा उपयोग होऊ शकतो आणि त्यामुळे प्रशिक्षण सत्र हे अधिकाधिक प्रभावी करता येऊ शकते.

## 2.3.4 शिक्षणाच्या फलिताचे निकष कसे ठरवणार?

प्रशिक्षण प्रभावी व्हायचे असेल तर त्यासाठी फलितांचे मोजमाप 'स्मार्ट' पद्धतीने करावे लागते!

- *स्पेसिफिक*: नेमके आणि अचूक. त्यात कोणतीही संदिग्धता नको
- *मेजरेबल*: फलितांचे मोजमाप आकडेवारीत केले गेल्यास नेमकी किती उद्दिष्टे साध्य झाली आहेत, याचा ठोकताळा मांडता येतो.
- *अचिवेबल:* नेमके किती साध्य होऊ शकते, याचा गांभीर्याने विचार करा. (प्रशिक्षणाचे फलित फार मोठ्या प्रमाणावर हवे असेल तर त्यासाठी प्रशिक्षक तसेच प्रशिक्षणार्थी या दोहोंना बराच मोठा कालावधी खर्ची घालावा लागेल. तुम्हाला थोड्या काळात सत्र संपवायचे असेल तर फलितांच्या निकषाची मोजपट्टी ही खालच्या पातळीवरच ठेवावी लागेल.)
- *संदर्भासहित*: सर्वसाधारण विषय, तसेच त्याचा मुख्य गाभा आणि लक्ष्य गट यांच्याशी त्या फलितांचे नाते जुळायला हवे.
- *टाईमबाऊंड*: निश्चित स्वरूपाची कालमर्यादा.

**प्रत्येक कोर्स तसेच मॉड्युलमध्ये सर्वसाधारणपणे दोन किंवा पाच फलितांच्या अपेक्षा ठेवाव्यात. त्या अर्थातच प्रत्येक प्रशिक्षणार्थीची ज्ञान, कौशल्ये आणि प्रवृत्ती यानुसार ठरतील.**

- शिक्षणाची फलिते ठरवताना आणि त्यात प्रसंगानुरूप बदल करताना सहभागी पद्धत अवलंबणेच ईष्ट ठरते. त्यामध्ये व्यवस्थापनाचे प्रतिनिधी, कोर्स संचालक, फॅकल्टी, प्रशिक्षक आणि शिकणे तसेच शिकवणे हे सर्वांना मान्य होणारे आहे, याची खातरजमा करून घेणे हे सर्वांच्या दृष्टीने फायद्याचे ठरते. या संदर्भातील किमान अपेक्षांची चर्चा ही पुढील प्रकरणात केली आहे. संपूर्ण कोर्स झाल्यावर मूल्यांकन करतानाच, प्रत्येक मोड्युल वा कोर्स संपल्यावर तशी चर्चा करण्याची सवय ही अर्थातच अधिक फायदेशीर ठरू शकते.

- यातून पुढील प्रश्नांची उत्तरे मिळू शकतात:
  - प्रत्येक सत्राच्या शेवटी सहभागी प्रशिक्षणार्थींना नेमके किती आकलन झाले? नॉलेज सेशन
  - प्रत्येक सत्राच्या शेवटी सहभागी प्रशिक्षणार्थींना नेमके काय करता येऊ लागले? स्कील सेशन
  - प्रत्येक सत्राच्या शेवटी सहभागी प्रशिक्षणार्थींना काय सादरीकरण करता आले? ॲटिट्यूड सेशन

## 2.3.5 Formulation of learning outcomes correctly reflecting the expectations

This is a table with examples of verbs that can be used in learning outcomes.[1]

| Subject knowledge and understanding: recall information, explain in own words | Intellectual skills: analysis, synthesis, evaluation, problem solving | Practical skills: laboratory, workplace, field skills | Transferable/key skills: communication, team-working |
|---|---|---|---|
| Arrange | Apply | Use | Write |
| List | Calculate | Assemble | Present |
| Memorize | Classify | Repair | Cooperate |
| Recall | Complete | Diagnose | Assist |
| Outline | Design | Organize | Plan |
| Record | Demonstrate | Make | Empathize |
| Repeat | Interpret | Navigate | Finish |
| Reproduce | Solve | Manipulate | Listen |
| Select | Appraise | Build | Participate |
| Tabulate | Evaluate | Implement | Challenge |
| Describe | Analyse | Calibrate | Justify |
| Express | Synthesize | Record | Persuade |
| Paraphrase | Compare | Construct | Prioritize |
| Restate | Contrast | Project manage | Reconcile |
| Sort | Criticize | Invent | Debate |
| Review | Diagram | Demonstrate | Contribute |
| Tell | Discriminate | | Be open to |
| Locate | Question | | |
| Identify | Differentiate | | |
| Illustrate | Test | | |
| Summarize | Categorize | | |

The exact words will vary according to the subject or programme. The important thing is to use verbs that describe exactly what you expect the students to do.

1 King, G. 2012. *Handbook for the Training of Panel Members for External Quality Assurance Procedures*. ECA Occasional Paper. European Consortium for Accreditation in Higher Education. ISBN/EAN 978-94-90815-00. http://ecahe.eu/wp-content/uploads/2014/01/ECA_Handbook_for_the_Training_of_Panel_Members.pdf

## 2.3.5 शिक्षणाच्या फलितांच्या मांडणीचा तक्ता *

सत्रांत दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचे प्रतिबिंब फलितांमधून दिसावयास हवे. त्यासाठी तयार केलेला तक्ता. शिक्षण फलितांसाठी या तक्त्यातील क्रियापदे उदाहरणे वापरता येऊ शकतात. आणि समज: माहितीचे एका शब्दात ग्रहण व्यावहारिक कौशल्ये: प्रयोगशाळा, कामाची जागा, कार्यक्षेत्रातील कौशल्य[3]

| विषयाचे ज्ञान: माहितीचे एका शब्दात ग्रहण | बौद्धिक कौशल्ये: विश्लेषण, संश्लेषण, मूल्यांकन तसेच समस्यांचे निराकरण | व्यावहारिक कौशल्ये: प्रयोगशाळा, कामाची जागा, कार्यक्षेत्रातील कौशल्य | परिवर्तनीय कळीची कौशल्ये: संवाद तसेच गटातील काम |
|---|---|---|---|
| मांडणी करणे | लागू करणे | ऊपर | लिहिणे |
| यादी | मोजणी | एकत्रित करणे | सादरीकरण |
| लक्षात ठेवणे | वर्गीकरण | दुरुस्ती | सहकार्य |
| उजाळा देणे | संपूर्ण / संपविणे | निदान | सहाय्य |
| आराखडा | रचना | आयोजन | नियोजन |
| नोंदी | प्रात्यक्षिक | कृती | सहवेदना |
| पुनरावृत्ती | अर्थ लावणे | दिशा दाखवणे | समाप्त |
| पुन:निर्मिती | सोडवणे | धूर्तपणे हाताळणी | श्रवण |
| निवडणे | महत्त्व ओळखणे | बांधणी | सहभाग |
| तक्त्यातील मांडणी | मूल्यांकन | अंमलबजावणी | प्रतिवाद |
| वर्णन करणे | विश्लेषण | परिमोजणी | समर्थन करणे |
| व्यक्त करणे | संश्लेषण | नोदी | पाठपुरावा |
| दुसऱ्या शब्दांत स्पष्टीकरण | तुलना | बांधणी | अग्रक्रम ठरवणे |
| पुन्हा सांगणे | विरोधाभास | प्रकल्प व्यवस्थापन | सुसंगती ठरवणे |
| क्रम ठरवणे | टीकात्मक चर्चा | शोध घेणे | वाद-प्रतिवाद |
| पुनर्विलोकन | आकृती | प्रात्यक्षिक | योगदान |
| सांगणे | फरक ओळखणे | | खुल्या मनाने स्वीकार |
| शोधून काढणे | प्रश्न विचारणे | | |
| ओळखा | फरक लक्षात घ्या | | |
| उदाहरणांसहित सांगा | चाचणी | | |
| सारांशीकरण | विभागवार नोंदी | | |

सत्रातील विषयानुसार हे शब्द बदलू शकतात आणि त्या त्या वेळी नेमके शब्द वापरावे लागतात. महत्त्वाची बाब म्हणजे प्रशिक्षणार्थींकडून नेमके काय अपेक्षित आहे, त्यानुसार योग्य ती क्रियापदे वापरणे ही आहे.

3 किंग जी. 2012 हॅण्डबुक फॉर ट्रेनिंग ऑफ पॅनेल मेम्बर्स फॉर एक्सर्टनल क्वालिटी अॅशुरन्स प्रोसिजर्स. इ.सी.ए. ऑकेजनल पेपर. युरोपियन कन्सोर्शियम फॉर अॅक्रिडियशन इन हायर एज्युकेशन ISBN/EAN 978-94-90815-00. http://ecahe.eu/wp-content/uploads/2014/01/ECA_Handbook_for_the_Training_of_Panel_Members.pdf

# SECTION 3

## A journey through a selection of training methods

This section provides a comprehensive list and overview of various training methods that can be used by the trainers- either in the original form or after necessary adaptation to suit a specific group of participants. There is an attempt to elaborate a few selected training methods and approaches in the coloured boxes in this section. There are some methods and approaches that were found to be effective in not only supporting the content delivery but also brought in a change of perspective and attitude among the media students. Some of these pre-module methods are: Baselining expectations, Connectedness to nature and Icebreakers. Sketches, photos from the pilot testing and video clips (in the online version of this guide) will help the trainers simulate the use of the training method.

# विभाग 3

# प्रशिक्षणाच्या पद्धतींच्या निवडीचा प्रवास

या विभागात प्रशिक्षणाच्या विविध पद्धतींचा आढावा तसेच एक परिपूर्ण यादी देण्यात आली आहे. या पद्धती प्रशिक्षकला जशाच्या तशा वा प्रशिक्षणार्थींच्या गरजांनुसार आवश्यक ते बदल करून वापरता येऊ शकतील. काही निवडक पद्धती येथे अधिक विस्ताराने दाखवण्यात आल्या आहेत आणि त्यासंदर्भात काही रंगीत तक्तेही सोबत आहेत. प्रसारमाध्यमांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये आवश्यक तो दृष्टिकोन यामधून निर्माण व्हावा, अशी अपेक्षा आहे. त्यातून ते आपला आशय अधिक परिणामकारक पद्धतीने दुसऱ्यांपर्यंत पोहोचवू शकतील. निसर्गाशी जोडले जाणारे नाते, तसेच रेखाचित्रे, छायाचित्रे आणि काही व्हीडिओ क्लिप्स यांच्या माध्यमातून प्रशिक्षकाला प्रशिक्षण पद्धती अधिक परिणामकारक करता येतील.

# 3.1 Introduction session

## 3.1.1 Icebreakers

Icebreakers are needed when people are still ‘frozen,’ i.e., inhibited in their communication. Icebreakers are often used for groups where the people do not know each other very well or are even meeting for the first time. Icebreakers help remove the initial barrier of shyness that people may experience during a first encounter. There are many ways of breaking the ice or raising the energy level in a group. You may sing, dance or do some of the following funny activities.

Icebreakers are often used as ‘getting-to-know exercises.’ When choosing from the selection below, bear in mind the time available to you and the specific needs and tastes of the group at hand.





# 3.1 विषयाची ओळख

## 3.1.1 मुद्द्याला हात

समोरचे लोक जेव्हा 'थंड' बसलेले असतात, तेव्हा त्यांना आपल्याला हव्या त्या विषयात 'गुंतवून' टाकण्याच्या काही क्लृप्त्या असतात! त्यांना 'आईसब्रेकर्स' अशी संज्ञा आहे. उदा.: जेव्हा लोक एकमेकांशी संवाद साधायला कचरत असतात; कारण त्यांची एकमेकांशी ओळखच झालेली नसते किंवा ते एकमेकांना प्रथमच भेटत असतात. 'आईसब्रेकर्स'मुळे पहिल्याच भेटीतील सु-संवादातील हे प्राथमिक अडथळे ओलांडून जाण्यास मदत होते. हा 'अनोळखीपणा' अनेक प्रकारांनी दूर करता येतो आणि त्यातून गटात नवी ऊर्जा निर्माण होते. तुम्ही अचानक गायला सुरुवात करा; वा त्यांना समूहनृत्यात सहभागी व्हायला लावा किंवा अन्य कोणतीही 'विनोदी' ॲक्टिव्हिटी सुरू करा.

या 'आईसब्रेकर्स'चा मुख्य उद्देश एकमेकांची ओळख होणे आणि गटात समरसता निर्माण करणे हा असतो. पण, त्याची सुरुवात करताना तुमच्याकडे नेमका वेळ किती आहे, याचबरोबर तुमची नेमकी गरज काय आहे, हे ओळखून कोणता 'आईसब्रेकर' निवडणायचा याकडे ध्यान देणे जरुरीचे असते.

## 3.1.2 Fact or fiction?

Get the participants to write on a piece of paper three things about themselves that are not known to the group. Two are true, and one is not. The participants take turns to read out the three pieces of information. The group then votes on which one is untrue. Often there are surprises, and everyone learns more about the other participants. This works well when the members of the group know each other but do not work together on a day-to-day basis. This is good for smaller groups (in large groups it would take too much time). Keep up a suitable pace by moderating the voting as speedily as possible!

## 3.1.3 The question web

You will need a ball of string or preferably soft thick wool for this icebreaker. You will also need a set of 20 questions. Ask the participants to stand in a circle. Hold one end of the string and throw the ball to someone in the group asking that person a question like 'What is the colour of a rose?'. That person has to answer the question. After answering it, holding the string, she then throws the ball of wool to another member of the group, who then answers the next question. Continue until everyone has had a turn. Eventually this will create a web of interesting information as well as it will connect everyone to each other with the woolen string forming a web–and it will be one of a kind! You can use any questions that you like. (Here are some sample questions: If you had a time machine that would work only once, what point in future or history would you visit and why? If you could go anywhere in the world, where would you go and why? If your house were burning down, what three objects would your save and why? If you could talk to someone now living, who would it be and why? If you had last week over again, what would you do differently?)

## 3.1.4 Finding out

Each person is given an instruction on a card. He or she then has to speak to different people in the room according to the instruction. Some suggestions for instructions to include on the instruction card: Find out who has made the longest journey to get to the training event. Who has the most unusual hobby? Find out who has the biggest feet/largest family.

Icebreakers and energizers can also serve as team-building exercises.

## 3.1.5 Buddy system of introducing participants

The participants are randomly grouped into pairs of buddies. Alternatively, the trainers may distribute certain paired items randomly to the participants and then let them find their buddy, who carries the other half of the paired item. The buddies then spend 5 to 10 minutes getting to know each other, and then they all come together into the bigger plenary group. All stand or sit in an informal but systematic setting, and the buddies introduce each other. The trainer encourages the participants to get to know the following general information about their buddies:

- name
- where the person works, his/her main activity, his/her role in the organization
- major interest or pastime
- what the person hopes to get out of this course.
  (Avoid personal questions that may make the participants uncomfortable.)

## 3.1.2 कल्पना की वास्तव?

सहभागींना एक एक कोरा कागद देऊन, त्यावर त्यांना स्वत:ची ओळख सांगणाऱ्या आणि गटातील अन्यजणांना माहीत नसलेल्या तीन गोष्टी लिहायला सांगा. पैकी दोनच खऱ्या असतात आणि एक काल्पनिक! प्रत्येक जण त्या तीन गोष्टी वाचून दाखवतील आणि इतरांनी त्यापैकी कोणती खोटी वा काल्पनिक त्याबाबत मतदान करायचे असते. अनेकदा या खेळातून अनेक आश्चर्ये समोर येतात आणि त्यातून एकमेकांची चांगली ओळख होण्यास मदत होते. पण ही क्लृप्ती जेव्हा सहभागी एकमेकांना ओळखत असतात, तेव्हाच कामी येते. शिवाय, गट छोटा असेल तरच ही क्लृप्ती यशस्वी होते. मोठ्या गटासाठी ती फार वेळखाऊ ठरते. त्यामुळे हा खेळ वेगाने पुरा होईल, याकडे लक्ष द्यावे लागते.

## 3.1.3 प्रश्नांचे जाळे

या खेळासाठी तुमच्याकडे एक कापडी वा मऊ लोकरीचा दोरी असलेला चेंडू असायला हवा. त्याशिवाय 20 प्रश्नांचा एक संचही हाताशी हवा. सहभागींना गोल करून उभे राहायला सांगा. दोरीचे टोक हातात धरून गुलाबाचा रंग काय, असा प्रश्न कोणालाही विचारून त्याच्याकडे चेंडू फेका. त्याच व्यक्तीला त्या प्रश्नाचे उत्तर द्यायचे असते. उत्तर दिल्यावर ती व्यक्ती दोरीचे टोक धरून चेंडू दुसऱ्याकडे फेकेल आणि त्या व्यक्तीला दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर द्यावे लागेल. प्रत्येकाची पाळी येईपर्यंत हा खेळ सुरू ठेवा. त्यातून माहितीचे एक वेगळेच जाळे तयार होईल आणि सर्व सहभागींचे एकमेकांशी नातेही तयार होईल. (नमुन्याचे काही प्रश्न पुढीलप्रमाणे आहेत: तुमच्याकडे ‘टाईम मशीन’ असेल आणि ते एकदाच चालणार असेल तर भूत वा भविष्यातील कोणता प्रसंग तुम्हाला अनुभवासा वाटेल? तुमच्या घराला आग लागली असेल तर कोणत्या तीन गोष्टी वाचवाल? तुम्हाला जगात कोठेही जायची संधी मिळाली तर तुम्ही कोठे आणि का जाल? तुम्हाला सध्या जिवंत असलेल्या कोणाशीही बोलण्याची संधी मिळाली तर तुम्ही कोणाशी आणि का संवाद साधाल? तुम्हाला गेला आठवडा पुन्हा जगण्याची संधी मिळाली तर तुम्ही कोणती गोष्ट वेगळी कराल?

## 3.1.4 शोधयात्रा

प्रत्येक सहभागीला एका कार्डावर एक सूचना दिली जाईल. त्या व्यक्तीला सूचनेनुसार वर्गातील वेगवेगळ्या व्यक्तींशी बोलावे लागेल. काही सूचना सूचकही असतील. प्रशिक्षणाच्या काळात कोणी सर्वाधिक प्रगती केली आहे. कोणाला काही आगळावेगळा छंद आहे काय? कोणाचे कुटुंब सर्वात मोठे आहे?

चौकट ‘आईसब्रेकर्स’ आणि चैतन्यदायी खेळांमुळे संघभावना वाढीस लागण्यास मदत होते.

## 3.1.5 सहभागींच्या परस्पर ओळखीची मैत्रीपूर्ण पद्धत

सहभागींच्या अनपेक्षितपणे जोड्या जमवल्या जातात. त्यानंतर काही जोडीतल्या वस्तू ‘रँडम’ पद्धतीने वितरित केल्या जातात आणि आपल्या हातात आलेल्या वस्तूची जोडी असलेला मित्र त्यांना शोधायला सांगितले जाते. त्यासाठी पाच ते दहा मिनिटांचा कालावधी दिला जातो. वातावरण अगदीच अनौपचारिक असते. प्रशिक्षक आपल्या मित्राची माहिती त्यांना विचारायला प्रोत्साहित करतो. उदा:

- नाव
- मित्र काम कोठे करतो. त्याचे मुख्य काम काय? संघटनेत त्याचे नेमके स्थान काय?
- फावल्या वेळेतील छंद?
- या प्रशिक्षणातून तो काय साध्य करू इच्छितो?
  (खाजगी प्रश्न, ज्यामुळे ‘मित्र’ अस्वस्थ होईल, असे प्रश्न टाळावेत)

## 3.1.6 Associating the participants with pictures

The trainer selects pictures of different coastal and marine habitats and species that represent different aspects of coastal and marine issues. The trainer asks participants to stand and form a circle and spreads the selected pictures on the ground. The trainer asks the participants to reflect before picking a picture that catches their eyes the most. Each participant introduces himself or herself by picking up a picture that he or she identifies with and explains what prompted him or her to select that particular picture.



An array of pictures are offered to the participants to choose from. Participants show their pictures and explain their choices to the rest.



Participants express themselves with the help of their chosen picture



Pictures placed on the ground in the middle of the circle of participants

## 3.1.6 सहभागी आणि चित्रांची ओळख

प्रशिक्षक सागरी तसेच किनारपट्टीवरील भागांतील विविध समस्यांचे चित्रण करणारी स्थानिक रहिवासी तसेच तेथील प्राणी-पक्षी जीवन यांची विविध चित्रे सादर करतो. सहभागींचे लक्ष वेधले जाण्यापूर्वी प्रशिक्षक त्यांना चित्रे निवडून त्यातून त्यांना काय दिसले, त्याचे वर्णन करायला सांगतो. आपण निवडलेल्या चित्राशी अशा रीतीने प्रशिक्षणार्थींचे नाते जोडले जाते.



प्रशिक्षणार्थींना विविध प्रकारची भरपूर चित्रे दिली जातात. त्यातून ते निवड करतात.





आपले चित्र दाखवतात आणि निवड का केली ते इतरांना समजावून सांगतात.

# 3.2 Baselining experiences and expectations

**Duration:** 30 minutes

**Material required:** Pin boards, cards, pens/PPT with discussion

## 3.2.1 What is the collective experience and expertise in this group?

A good way to take adult audiences seriously (and familiarize your audience initially with dynamic visualization) is to get information on the participants' experience and expertise on the first day. It is important to know details such as what the participants actually know on the topics to be taught during the course, their language skills and their interest areas within the media:

- Use the living chart method as explained on page 26.
- Ask the participants to stand in a group in the middle of the room.
- Ask them, 'How much do you think you already know about coastal and marine biodiversity?'



# 3.2 प्रयोग आणि अपेक्षा यांची किमान पातळी

**वेळ:** 30 मिनिटे

**सामग्री:** पीन बोर्डस, कार्ड, पेन/पीपीआय आणि सोबत चर्चा

## 3.2.1 या गटातील सामुहिक अनुभव आणि सखोल विश्लेषण काय?

दृश्यांचे प्रभावशाली सादरीकरण प्रौढ गटांमध्ये करण्याचा सर्वोत्तम मार्ग सहभागींचे अनुभव आणि त्याबाबत तज्ज्ञांचे मार्गदर्शन हाच किमान पहिल्या दिवशी तरी असतो. शिकवण्याच्या विषयासंबंधात सहभागींना नेमके काय माहिती आहे तसेच त्यांचे भाषाविषयक ज्ञान आणि प्रसारमाध्यमांतील नेमक्या कोणत्या बाबींमध्ये त्यांना रस आहे, ते प्रथम जाणून घ्यायला हवे.

- पान अमूक वरील तक्त्याचा वापर करा.
- वर्गाच्या मध्यभागी सहभागींना एका गटात उभे करा.
- 'तुम्हाला सागरी तसेच किनारपट्टीवरील जैवविविधतेबाबत काय काय माहिती आहे?' ते त्यांना विचारा.






- Identify two opposite corners of the room as the two ends of an imaginary scale—one corner representing 'I know everything that I need to now' and the other corner representing 'I don't know anything on coastal and marine biodiversity.'
- Ask the participants to place themselves on this scale to give their answer. Those who think that they know everything that they need to know should stand at the first corner of the room, while those who think that they do not know anything should stand at the second corner. Those participants who know about coastal and marine biodiversity to some extent should place themselves at an appropriate place on this scale. Encourage them to talk to each other to find out their relative placement on the scale.

You can register in your mind, or take a picture of, the relative positions of the participants on the scale or write down the names of participants who know much or those who do not know anything. At the same time, encourage participants to share their experience (those who place themselves relatively high on the scale).

Now, ask the next question and let the participants change their positions according to the new question.

This method helps the trainer understand the general level of the class—whether all the participants already know something on the subject, their geographical origins (to help pitch the examples), their interest in specific media streams (print, film making, electronic, etc.) and their language skills. If the trainer finds out that four out of 20 students in the class are not very comfortable in the language that is expected to be the mode of instruction, the trainer can identify among the participants a translator who can help these students translate the difficult portions of the training material during the breaks or as and when required. Similarly, the trainer can adapt the training methods and examples for the training to have the greatest impact.




- वर्गखोलीचे दोन कोपरे निश्चित करा आणि त्यातून मोजपट्टी उभी करा. एक कोपरा 'मला आवश्यक ते सर्व ठाऊक आहे' असे म्हणणाऱ्यांचा तर दुसरा 'मला सागरी वा किनारपट्टीवर जैवविविधतेबद्दल काहीच माहीत नाही' असे सांगणाऱ्यांचा.

- सहभागी प्रशिक्षणार्थींना या दोन कोपऱ्यांमधील 'काल्पनिक' मोजपट्टीचा अंदाज घेऊन उभे राहावयास सांगा. ज्यांना आपल्याला यासंबंधात काहीच माहीत नाही, असे म्हणावयाचे असेल ते अर्थातच दुसऱ्या कोपऱ्यात उभे राहतील आणि ज्यांना आपल्याला सर्व काही ठाऊक आहे, असे वाटत असेल ते पहिल्या कोपऱ्यात जातील. काहींना आपल्याला सागरी तसेच किनारपट्टीवरील जैवविविधतेबाबत थोडीफार माहिती आहे, असे वाटत असेल ते या मोजपट्टीचा साधारण अंदाज घेऊन त्या त्या जागी जातील.

वर्गातील दृश्यावरून तुम्ही एकंदर सहभागींच्या विचारांचा अंदाज घेऊ शकता. वाटल्यास तुम्ही या दृश्याचे छायाचित्रही काढून ठेवू शकता. किंवा तुम्ही सहभागी प्रशिक्षणार्थींची नावेही या मोजपट्टीनुसार टिपून ठेवू शकता. त्याचवेळी सहभागी प्रशिक्षणार्थींना, विशेषत: जे 'हायर स्केल'वर उभे आहेत, त्यांना तुम्ही आपल्या भावनाही मोकळेपणाने 'शेअर' करण्यास सांगावे.

आता नवा प्रश्न विचारा आणि त्यानुसार पुन्हा प्रशिक्षणार्थींनी याच मोजपट्टीवर जाऊन उभे राहायला सांगा.

या पद्धतीमुळे प्रशिक्षकाला वर्गातील सहभागींची सर्वसाधारण समज वा पातळी काय आहे, ते समजण्यास मदत होते. शिवाय, आपल्या विषयाचे ज्ञान या प्रशिक्षणार्थींकडे कितपत आहे, याचाही अंदाज येऊ शकतो. ते कुठल्या भूप्रदेशातून आले आहेत, याबाबतही काही उदाहरणे देऊन याच वेळी माहिती करून घेता येते. त्याचवेळी प्रिंट, फिल्म बनवणे वा इलेक्ट्रॉनिक मीडिया यापैकी कोणाकडे त्यांचा कल आहे, याबरोबरच त्यांची भाषाविषयक कौशल्ये कशी आहेत, हेही समजून घेता येते. वर्गातील 20 प्रशिक्षणार्थींपैकी चार विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाची भाषा समजत नाही, असे प्रशिक्षकाच्या लक्षात आले तर या विद्यार्थ्यांसाठी अनुवादक देऊन तो अवघड बाबी त्यांना भाषांतरित करून सांगू शकेल काय, याचाही विचार या निमित्ताने करणे सोपे होते. त्याशिवाय प्रशिक्षण प्रभावशाली होण्याच्या दृष्टीने आपल्या पद्धती कशा बदलून घ्याव्यात तेही त्याच्या लक्षात येते.

## 3.2.2 Cross-checking learning outcomes and schedule

### What are we going to learn from this course?

- Pin the cards with the learning outcomes of the overall course (one on each card) on the board.
- Ask for volunteers who will share their views about the learning outcomes.
- Facilitate a dialogue among the participants on any additional learning outcomes required.

### How are we going to learn in this course?

- Place the schedule of each week/month on cards (four long cards). Place the contents of each module on cards (seven rectangular cards). Place the contents of each field visit on cards (three or four oval-shaped cards.)
- Spread the cards on the floor and ask the participants to pick a card of their choice each.
- Start explaining the schedule and request the participants to explain what is planned for each week/module/field visit in turn.
- Ask the participants pin the cards on the board and request them to tell everyone what made them interested in their particular cards.
- Get the opinions of the participants on the overall schedule. Ask them to express their comfort levels on anything. Try to explain the reason for any specific module/activity when a question is raised. Take a majority vote if a genuine problem in the schedule is hinted at, and see how it can be adapted. Involve the participants in adapting the schedule (e.g., if they are not comfortable with the schedule of a field visit. Then explain to them the arrangements and appointments that have already been made for the field visit, and ask for their support in modifying the plan. If they wish to add some new topics to the curriculum, ask them to identify a time slot in the schedule. Ask also if there is someone among the participants who can serve as a resource person to explain the topic to the fellow participants.




Alternatively, the development of the baseline can also be done via a PowerPoint presentation and students asked to contribute on the screen in case the time and resources do not allow the use of pin boards and cards. The Powerpoint method takes approximately half the time that the pin board method takes.

Baselining is ideally done at the beginning of each session/module since each module deals with specific contents and has specific learning outcomes. Trainers are therefore encouraged to conduct a quick baseline session at the beginning of each module.

## 3.2.2 प्रशिक्षणाची फलिते तसेच वेळापत्रक यांचे क्रॉस चेकिंग

### या प्रशिक्षण वर्गातून आपण नेमके काय शिकणार आहोत?

- एका कार्डावर एक फलित या प्रकारे तयार केलेली कार्डे बोर्डावर पिन करा
- त्यासंबंधात कोण स्वत:हून बोलायला तयार आहे, असे विचारून त्यांना आपली मते मांडू द्या.
- यापेक्षा आणखी काही फलित या प्रशिक्षणातून अपेक्षित आहे काय, याची चर्चा घडवून आणण्यास मदत करा.

### आपण या वर्गात कसे प्रशिक्षण घेणार आहोत?

- चार मोठ्या कार्डांवर तयार केलेले प्रत्येक आठवड्याचे वा महिन्याचे वेळापत्रक समोर ठेवा. प्रत्येक मॉड्यूलमधील विषय आणि आशय (कण्टेण्ट) त्यात असायला हवा. शिवाय फील्ड वर्कचे वेळापत्रक आणि तेथे काय करायचे आहे, तेही तीन वा चार वेगळ्या कार्डांवर तयार करून घ्या.
- ती कार्डे जमिनीवर पसरा आणि प्रत्येकाला आपल्या आवडीचे कार्ड निवडायला सांगा.
- वेळापत्रक आणि त्यातील आशयाचे स्पष्टीकरण द्यायला सुरुवात करा. प्रत्येक आठवडा, प्रत्येक मॉड्यूल आणि वस्ती पातळीवरील भेटींचा तपशील त्यांना समजावून सांगा.
- प्रशिक्षणार्थींनाच आपापली कार्डे बोर्डावर पिन करायला सांगा आणि त्याचवेळी त्यापैकी नेमक्या कोणत्या बाबी त्यांना आवडल्या वा त्यांना कोणत्या बाबींमध्ये विशेष रस आहे, ते 'शेअर' करायला सांगा.
- संपूर्ण वेळापत्रकाबाबत सहभागीप्रशिक्षणार्थींची मते जाणून घ्या. त्यापैकी कोणत्या बाबींवर ते खूश आहेत, ते समजून घ्या. एखादे मॉड्यूल वा कार्यवाही याबाबत त्यांना काही शंका असल्यास ती मोकळेपणाने समजून त्यामागील उद्देश स्पष्ट करा. काही खरोखरच मूलभूत स्वरूपाची शंका असल्यास त्यावरचा तोडगा थेट मतदान घेऊन काढण्याचा प्रयत्न करा. वस्तीपातळीवरील एखाद्या विशिष्ट भेटीबाबत ते नाराज दिसल्यास त्यासाठी केलेले नियोजन तसेच मुलाखतींच्या ठरवलेल्या वेळा त्यांना स्पष्ट करून सांगा आणि या नियोजनात काही बदल करायचा असल्यास त्यात सहभागी व्हायला प्रवृत्त करा. ते काही नवा विषय मॉड्यूलमध्ये अंतर्भूत करू इच्छित असतील, तर त्यांनाच त्यासाठी वेळेचे नियोजन करायला सांगा. इतर सहभागी प्रशिक्षणार्थींना तो विषय स्पष्ट करून सांगण्यासाठी त्यांच्यापैकीच कोणी रिसोर्स पर्सन व्हायला तयार आहे काय, हेही विचारा.




पिन बोर्ड वा कार्ड्स यांचा वापर करण्यास पुरेसा वेळ नसेल, तर हाच उपक्रम पॉवर पॉईंट सादरीकरणाच्या माध्यमातूनही घडवून आणता येईल आणि प्रशिक्षणार्थींना त्यात सहभागी करून घेता येईल. पॉवर पॉईंट पद्धतीत वेळेची बचत अंदाजे निम्म्याने होऊ शकते.

प्रत्येक सत्राच्या वा मॉड्युलच्या प्रारंभी हा उपक्रम घेतल्यास ते अत्यंत उपयुक्त ठरते; कारण प्रत्येक मॉड्युलचा आपला असा विशिष्ट आशय असतो आणि त्याची काही विशिष्ट फलिते असतात. प्रशिक्षकांनी त्यामुळे प्रत्येक मॉड्युलच्या प्रारंभी हा उपक्रम आयोजित करून त्यात सहभागी होण्यासाठी प्रशिक्षणार्थींना प्रोत्साहन दिले पाहिजे.



Nobody knows everything;
everybody knows something

कोणासही सर्वकाही ज्ञात नसते/ माहीत
नसते प्रत्येकास काहीतरी माहीत असते



# 3.3 Session on connectedness to nature[1]

True connectivity in any relationship, be it interpersonal or with elements of nature, serves to strengthen empathy and concern. Because of personal transformations brought about by the positive effects of nature, connectedness will give rise to novel types of directives to media students, trainers and practitioners that will result in care and attentiveness to what is happening in the coastal and marine ecosystems around them, which might subsequently lead to positive outcomes in the form of increased newsworthiness of issues related to coastal and marine biodiversity and ecosystems.

The responses of society to the loss of biodiversity are increasing dramatically, and judging from national plans and commitments, they are expected to continue to increase. However, the overall responses appear to be insufficient relative to the pressures. This sobering outlook leads one to conclude that there is something fundamental lacking in our relationship with nature. The term 'nature connectedness' encompasses both our inner and outer nature. Contemplating natural settings calms the psyche and is a way of connecting not only to our natural surroundings, including other creatures, but also to our own consciousness. Ecological consciousness then is simply the consequence of a clear and quiet mind in contact with its origins.

Rapidly increasing scientific evidence reviewed by Selhub and Logan (2012) confirms that the brain is absolutely influenced by nature. The sciences of biology, psychology, neurology and mind-body research all inform us of different aspects of *how* nature influences the human mind and affects health and behaviour. Our perception of stress, our mental state, our immunity, our happiness and our resilience are all chemically influenced by the nervous system and its response to the natural environment.

**Nature experiences have the ability to promote a sense of cognitive clarity wherein there is an absence of confusion. This type of mental focus has served humans well in the natural environment for a very long time.**

Adult memory performance can be disturbed by just a few days of elevated levels of the stress hormone cortisol, and even low-level elevation of the levels of pro-inflammatory immune chemicals (cytokines) impairs verbal and nonverbal memory. If nature can lower stress hormone levels and keep inflammation in check, it follows that nature can be of enormous importance to cognitive health.

Lyubomirsky et al (2005) showed that time spent in contemplation, particularly what is called 'loving kindness meditation,' produces increases in positive emotions and builds personal resources.

1 Text contributions by Martina Hoft and Ajay Rastogi for this section are gratefully acknowledged.

# 3.3 निसर्गाशी नाते कसे जोडावे?[4]

कोणत्याही नात्यात मग ते दोन व्यक्तींमधील असो की निसर्गातील काही घटकांशी असो, ते जुळले तरच समोरच्या विषयाबाबत सहानुभूती वा काळजीची भावना निर्माण होऊ शकते. प्रसारमाध्यमांच्या प्रशिक्षणार्थींमध्ये असे नाते जोडले गेले तरच किनारपट्टी वा सागरी भागात नेमके काय सुरू आहे, याबाबतचा थेट अंदाज येऊ शकतो. त्यातून बातमीमूल्ये असलेले प्रसंग वा घटना अधिक सकारात्मकरीत्या उजेडात येऊ शकतात आणि त्यामुळे किनारपट्टीवरच्या तसेच सागरी भागाशी संबंधित प्रश्नांना प्राधान्य मिळू शकेल.

जैवविविधतेच्या होत असलेल्या विनाशाबद्दल समाजात सध्या अधिक जाणीवा निर्माण होत आहेत आणि राष्ट्रीय पातळीवरील योजना आणि आराखडे बघता त्यात अधिकाधिक वाढच होत जाऊ शकते. तरीही दबावगटांचा प्रभाव पाहता या जाणीवा एकंदरितच अपुऱ्या ठरू शकतात. त्यामुळे निसर्गाशी असलेल्या आपल्या नात्यात काही तरी मोठी उणीव असल्याचा निष्कर्ष काढता येतो. 'निसर्गाशी नाते' ही संकल्पना बाह्य तसेच अंतर्गत निसर्गाचाही विचार करते. याचा अर्थ केवळ निसर्गातील प्राणीमात्रांशी अनौपचारिक नाते जोडून उपयोगाचे नाही तर त्याचबरोबर तर आपल्या देहभानातच ते जुळायला हवे. सुस्पष्ट आणि निरामय मन असेल तरच पर्यावरणीय सजगता निर्माण होऊ शकते.

सेल्हब आणि लोगन (2012) यांनी वेगाने पुढे आणलेल्या शास्त्रीय पुराव्यांनुसार आपल्या मेंदूवर निसर्गाच मोठा प्रभाव असतो, यावर शिक्कामोर्तब झाले आहे. जीवशास्त्र, मानसशास्त्र तसेच मज्जातंतूंच्या शास्त्रीय अभ्यासातून निसर्ग आपले मन तसेच शरीर यावर 'कसा' परिणाम करतो, ते पुढे आले आहे. आपले मानसिक तणाव तसेच आपली मानसिक अवस्था आणि आपली रोग प्रतिकार शक्ती यांचे आपल्या मज्जासंस्थेशी तसेच नैसर्गिक पर्यावरणाला आपण देत असलेल्या प्रतिसादाशी निकटचे नाते असते.

आपल्या स्मरणशक्तीचा ऱ्हास 'कोर्टिसॉल' या स्ट्रेस हार्मोन्सच्या वाढीमुळे होऊ शकतो. त्यात अगदी थोडी वाढ झाली तरी शाब्दिक वा अन्य प्रकारच्या स्मरणशक्तीवर परिणाम होऊ शकतो. निसर्गामुळे या तणाव निर्माण करणाऱ्या हार्मोन्सची पातळी कमी राहत असेल तर तर मानसिक प्रकृतीसाठी निसर्ग किती मोठे योगदान देऊ शकतो, ते स्पष्ट व्हावे.

**निसर्गाच्या सांनिध्यामुळे वैचारिक स्पष्टता येते. गोंधळ दूर होतो, एकाग्रता येते. त्यामुळे बराच काळ लक्ष केंद्रित होऊ शकते.**

ल्युबोरमिर्स्की (2005) यांनी असे दाखवून दिले आहे की 'प्रेमाने केलेली ध्यानधारणा' ही सकारात्मक भावना जागृत करतेआणि त्यातून वैयक्तिक संसाधने वाढण्यास मदत होते.

4 या भागाच्या मजकुरासाठी मार्टिना हॉफ्ट आणि अजय रस्तोगी यांचे आभार.

**Contemplative practices are gradually gaining ground in the academia. Schools as well as universities are adopting elements of contemplative education in teaching mainstream subjects** (see, e.g. ACMHE Association for Contemplative Mind in Higher Education). Discoveries in science, artistic breakthroughs and the common classroom experience are instances of direct perception breaking into our habitual awareness with a novel cognitive insight. A number of studies have shown that immersion in and connectedness to nature foster pro-environmental attitudes and behavioural patterns (Zaradic et al 2009; Lohr and Person-Mims 2005; Thompson et al 2005; Frantz et al 2005). The practice of nature contemplation and experiences of nature connectedness can ignite ecological consciousness and strengthen the motivation to lead truly sustainable lifestyles in line with the biological and agricultural roots of human civilization.

## Tools for behavioural transformation

There is an urgent need to develop tools and techniques to reset the balance, to strengthen our innate bond with nature, to give emotions their rightful place at par with rational thinking and to acknowledge the wisdom inherent to ancient Eastern philosophies, native or indigenous perceptions and the principles alive in traditional communities, which emphasize equilibrium, reciprocity, solidarity and collectiveness. These are often reflected in meaningful ceremonies related to natural cycles and mindful thanksgiving, which can significantly improve our connection with both our external and internal nature.

Compassion, loving kindness, integrity and care strengthen the resolve to protect and respect nature. Several techniques are proposed for reorientation and anchoring. Ceremony and practical exercises, including contemplation, play an essential part.

The peaceful state of mind, tranquillity and clarity of thoughts and feelings resulting from nature connectedness have the inherent power to counteract destructive consumerism, which is generally acknowledged to be one of the root causes of environmental degradation.

## Goals

- Strengthen the mind-body connection with nature, in particular with the marine and coastal environment.
- Strengthen the resolve to implement decisions that respect nature and ecosystem processes.
- Enable appreciation of key elements inherent to nature and in particular the marine and coastal environment: power, functionality, beauty and connectedness. Encourage MPA managers to actively participate and engage stakeholders in the practice of nature contemplation.
- Enable nature and human wellness to be experienced.

**अशा प्रकारचे ध्यानधारणेचे उपक्रम आता शैक्षणिक संस्थांमध्येही आयोजित केले जाऊ लागले आहेत. मुख्य विषयांच्या अभ्यासाबरोबरच आता शालेय तसेच विद्यापीठीय पातळीवरही हाती घेतले जात आहेत.**
(उदा.: असोसिएशन ऑफ कॉण्टम्प्लेटिव्ह माईंड इन हायर एज्युकेशन) विज्ञानाने लावलेले शोध वा कलात्मक पातळीवर नव्या संकल्पना यांच्याबरोबरच नेहमीच्या वर्गामधून सामोऱ्या येणाऱ्या बाबी सजगतेतूनच पुढे येत असतात. पर्यावरणीय सजगतेतूनच शाश्वत प्रेरणा मिळत राहतात, ही बाब आता नवी राहिलेली नाही.

## वर्तनात बदल घडवून आणण्यासाठी काय लागते?

निसर्गाशी आपले नाते अधिकाधिक मजबूत करणे, तार्किक विचारसरणीच्या बरोबरचे स्थान भावनांना देणे आणि पौर्वात्य तत्त्वज्ञानाला सलाम करणे, स्थानिक पातळीवरील विचारसरणीला तसेच पारंपरिक रीतीरिवाजांना मान देणे आणि  यांच्यात समतोल साधण्यासाठी काही साधने विकसित करण्याची मोठी गरज आहे. त्यातूनच समोरच्याला प्रतिसाद कसा द्यायचा, त्याच्याशी एकरूप कसे व्हायचे आणि सामुहिकतेचे भान कसे जपायचे ते लक्षात येते. त्यामुळेच आपले बाह्य तसेच आपल्या मनातील निसर्गाशी असलेले नाते घट्ट होऊ शकते.

प्रेमळ भावना, कणव, एकात्मता आणि दुसऱ्याबद्दलची काळजीची भावना असेल तरच निसर्गाचे संरक्षण आणि मानसन्मान करण्याची प्रवृत्ती निर्माण होते.

विचारांमध्ये सुस्पष्टता यावी, यासाठी घ्यावयाची अभ्याससत्रे तसेच अँकरिंग यासाठी अनेक कार्यपद्धती सुचवण्यात आल्या आहेत. सभारंभ तसेच प्रत्यक्ष कृती यांना यात मोठे स्थान आहे. निसर्गाशी जुळलेल्या नात्यातून येणारी मनाची निरामयता आणि निर्माण होणारे सुस्पष्ट विचार तसेच भावना यामुळे विघातक प्रवृत्ती दूर होण्यास मदतच होते. पर्यावरणीय ऱ्हासास अशा विघातक मनोवृत्ती प्रामुख्याने कारणीभूत असतात.

## ध्येय / उद्दिष्टे

- मन तसेच शरीर यांचे निसर्गाशी आणि विशेषत: सागरी तसेच किनारपट्टीवरील पर्यावरणाशी असलेले नाते अधिक दृढ करणे.
- निसर्ग तसेच पर्यावरणीय व्यवस्थेचा आदर करायचा निर्धार करणे. ऊर्जा, कार्यक्षमता, सौंदर्य तसेच जवळीक आदी कळीचे घटक लक्षात घेऊन निसर्ग आणि विशेषत: सागरी तसेच किनारपट्टी भूभागाचे कौतुक करणे. या भागाचे व्यवस्थापन करणाऱ्यांना नैसर्गिक साधनसंपत्तीचा आदर राखण्यास प्रवृत्त करणे.
- निसर्ग तसेच मानव यांचे आरोग्य जपण्यास प्रोत्साहन देणे.
- निसर्ग तसेच मानवी आरोग्याची अनुभूती

### 3.3.1 Exercise 1: Contemplation of nature

Eastern tradition informs us that contemplation leads to powerful insights of connectedness and oneness, which make it simply impossible to disregard and not care for nature or for each other. This consciousness in conjunction with exposure to nature can be a driving force in modifying the many harmful and destructive practices that we came to rely on for modern lifestyles.

Contemplation of nature deserves a special place among the many practices that are advocated for connecting with nature, such as *shinrin-yoku* (a Japanese concept that could best be translated as 'forest bathing' (Park et al 2010), exercising outdoors, owning a pet, gardening or wilderness therapies. While all these have their proven benefits, the emphasis is on human well-being, and care for nature is a side effect at best

Contemplation of nature can be practiced anywhere, anytime, and no equipment and no special instructions are needed. Anyone can take up this practice and incorporate it into their daily routine. Multiple benefits for the body and mind arise from a contemplative mind-set.

Contemplation of nature is akin to a meditative practice done in association with the natural environment. It involves three steps: soft gaze, disinterestedness and sympathetic attention.

*Soft gaze.* One chooses a view to observe. This could be a landscape, water body, agricultural field, garden or hedge. If there is no access to nature outdoors, one can choose to contemplate on a potted plant, flowers, leaves, stones, sea shells, etc. indoors. One's attention is gently focussed on the view or the object. The eyes can blink as naturally as they do. If one is tired or feels better by closing the eyes briefly, there is no problem. Often thoughts start to rush in as soon as the eyes are closed. If that happens, the eyes should be opened as one reminds oneself about contemplating nature. Open eyes help because nature is a multi-sensuous engagement (sight, hear, smell, etc.). This is a support even though one is not consciously engaging the senses.

*Disinterestedness.* This is about distance from the subject's own needs, desires, concerns and outcomes in the process of contemplation. To put it more classically, this element in the practice is 'transcendental.' Though one is fully aware of one's own presence and that of the view or the object, one is not exercising the mind to find out any details about the view or the object.

*Sympathetic attention.* This comes from the well-developed field of loving kindness meditation. This practice, in which one directs compassion and wishes for well-being toward real or imagined others, is designed to create changes in emotion, motivation and behaviour in order to promote positive feelings and kindness towards the self and others. What is required is to just gently remind oneself once that without the elements of nature survival would be impossible and to continue, remaining disinterested and maintaining a steady soft gaze.

**Contemplative practice creates a naturalness orientation and inner motivation for a simpler and richer life more in line with the biological and agricultural roots of human civilization. Evidence for the positive outcomes of sustained contemplative practice on health and behavioural transformations is increasing.**

The recommended duration is about 30 minutes. Scientific research into the mind-body connection has pointed out that after about 22 minutes of a restful mind, a much deeper physiological relaxation starts to take place. This finding has ushered a relaxation revolution and given rise to several techniques such as mindfulness-based stress reduction (MBSR).

## 3.3.1 अभ्यास 1: निसर्गाचे मनन

पौर्वात्य परंपरेने हे आपणास सांगून ठेवले आहे की ध्यानधारणेमुळे आपण निसर्गाशी अशा प्रकारे तादात्म्य पावतो की निसर्गाचा अवमान करणे, हे आपल्यासाठी केवळ अशक्य होऊन जाते. त्यातून जी काही दृष्टी मिळते, त्यामुळे आधुनिक जीवनशैलीने आपल्याला शिकवलेल्या अनेक विघातक प्रवृत्तींचा लोप होण्यास मदत होते.

निसर्गाच्या चिंतनाला निसर्गाशी नाते जोडण्याच्या प्रक्रियेत फार महत्त्वाचे स्थान आहे. उदा.: 'शिनरीन योकू' - ही एक जपानी आचरणशैली असून त्याचे सर्वात उत्तम भाषांतर हे 'निसर्गस्नान' असे होऊ शकते. (पार्क 2010). मोकळ्या मैदानातील शारीरिक व्यायाम वा कुत्रा पाळणे, वा बागकाम तसेच अन्य नैसर्गिक उपक्रमांचा त्यात समावेश आहे. यापैकी प्रत्येक गोष्टीचे काही ना काही फायदे असले, तरी त्याचा मुख्य उद्देश हा आपले आरोग्य उत्तम राखणे हा आहे. निसर्गाची काळजी घेण्याची जाणीव हा त्याचा उप-फायदा आहे!

निसर्गाचे ध्यान वा चिंतन हे कोठेही, कोणत्याही वेळी करता येते आणि त्यासाठी कोणत्याही विशेष साधनसामग्रीची वा समुपदेशनाची गरज लागत नाही. कोणीही अगदी सहजपणे हा उपक्रम हाती घेऊ शकतो आणि आपल्या दैनंदिन रहाटगाडग्यात त्याचा समावेश करून घेऊ शकतो. एकदा का चिंतनात्मक जीवनशैलीची सवय झाली की त्याचे मनास तसेच शरीरास अनेक लाभ होऊ शकतात.

निसर्गाचे चिंतन हे अनेकार्थांनी नैसर्गिक वातावरणात केलेल्या ध्यानधारणेसारखेच असते. त्याच्या तीन पायऱ्या आहेत. निसर्गाचे सहजदर्शन, अरूची आणि सहानुभूतीपूर्ण नजर.

*निसर्गाचे सहजदर्शन:* कोणत्याही एका दृश्याची नजर लावण्यासाठी निवड करा. ते दृश्य म्हणजे एखादा नैसर्गिक देखावा असू शकतो वा जलस्त्रोत वा शेत वा एखादी बाग वा जंगल. जर तुम्हाला त्यासाठी घराबाहेर जाता येत नसेल तर घरातल्याच एखाद्या कुंडीत फुललेले झाड वा फुले, पाने, दगड, शंख-शिंपले याकडे नजर लावा. हळूहळू तुमचे चित्त त्याकडे आकर्षित होईल. तुमचे डोळे नैसर्गिकरीत्या मिचमिचतील. तुम्हाला दमल्यासारखे वाटत असेल वा मधूनच काही वेळ डोळे बंद ठेवणे तुम्हाला आरामदायी वाटत असेल तरी काहीच हरकत नाही. डोळे बंद करताच तुमच्या मनात नाना प्रकारच्या विचारांचा प्रवाह वाहू लागेल. तसे होताच डोळे उघडा आणि पुन्हा लक्ष निसर्गचिंतनावर केंद्रित होईल, याची दक्षता घ्या. डोळे उघडे ठेवण्याने या प्रक्रियेस साह्य होते; कारण निसर्गाकडे ध्यान देताना, दृश्य-आवाज-गंध असा अनेकार्थांनी विचार करावयाचा असतो. आपण सजगतेने या सर्व बाबींकडे लक्ष पुरवत नसलो तरीही ते आवश्यक आहे.

*निसर्गाविषयी अरूची:* विषयाची गरज, काळजी आणि फलित यापासून आपण किती दूर आहोत, त्यासंबंधातील हा मुद्दा आहे; कारण ही एका 'अलौकिक' प्रवासाची वाट आहे. आपल्याला आपले अस्तित्व तसेच समोरचे दृश्य यांचे भान असले तरीही आपण समोरच्या दृश्याचे वा विषयाचे तपशील शोधण्यासाठी मनाला जाणीवपूर्वक कामास लावत नसतो.

*सहानुभूतीपूर्वक लक्ष:* अत्यंत प्रेमाने केलेल्या ध्यानधारणेनंतरच ही स्थिती प्राप्त करता येते. या स्थितीत वास्तवातील वा काल्पनिक विषयाबद्दल अनुकंपा तसेच शुभेच्छांची गरज असते. किंवा या स्थितीत स्वत:विषयी वा विषयासंबंधातील भावनांमध्ये बदल घडवून आणत त्यांच्यासंबंधात सकारात्मक तसेच सौहार्दपूर्ण हेतूंनी बघायला लागते. त्यासाठी फक्त स्वत:ला ही जाणीव करून द्यायची असते की निसर्गातील घटकांशिवाय अस्तित्वच अशक्य होऊन जाईल.

> मानव प्राग्ऐतिहासिक काळात शेती करत होता आणि निसर्गाशी एकरूप झालेला होता. चिंतनशीलतेमुळे निसर्गाचा आपण एक भाग आहोत, याची जाणीव निर्माण होते आणि निसर्गाशी नाळ जोडली जाते.

यासाठी सुमारे 30 मिनिटांच्या कालावधीची गरज असते. मन आणि शरीर यासंबंधात झालेल्या शास्त्रीय संशोधनातून असे निष्कर्ष आले आहेत की निरामय अशा 22 मिनिटांनंतर मनाच्या खोल गाभ्यात पूर्णपणे मोकळे झाल्याची भावना निर्माण होते. हा शोध म्हणजे एका अर्थाने क्रांतीच होती आणि त्यातूनच मानसिक तणाव दूर करण्यासाठी अनेक तंत्रे विकसित करण्यात आली.

## 3.3.2 Exercise 2: Mindfulness

The following approach to mindfulness and connecting with nature was adapted from Zajonc (2009)

Austrian philosopher and social reformer Rudolf Steiner recommended a deep sensual engagement with the natural world, based on Goethe's worldview, in which 'Thinking ... is no more and no less an organ of perception than the eye or ear. Just as the eye perceives colours and the ear sounds, so thinking perceives ideas'. Steiner said that by enlivening our sense impressions, we can awaken to the living, spiritual dimensions of the Earth. Too often these impressions have become routinized and dead and so are fit to perceive only the mechanical and material dimensions of our world. In order to expand our experience and understanding, we need to deepen our sensual engagement with the world of colour, movement, sound—indeed with all of sense existence.

### Feeling and connecting with the elements

#### Earth

Collect a stone or a shell. In a coastal environment, a shell may be easily found on the beach. Observe its fixed shape, feel the weight, observe its unyielding surface, its self-contained quality. What are its colours, is it warm or cool? Sense its texture. Having entered deeply into the experience of the shell, turn aside or close your eyes and sustain the empty space of open awareness once again. Most likely the memory of the shell will appear. You will see its shape and varied colours and feel its surface again with your mind's eye. Intensify the memory image. Give yourself the time needed to fully re-envision the shell.

Keeping the eyes closed or looking the other way, continue by releasing the memory image completely in order to feel the after-image of the shell or the emptiness. The difficult practice of silence, without expectation, but with the presence of the mind, begins. Sustain the empty silent space. Repeat the exercise, turning rhythmically and slowly between concentration on the shell and open space.



## 3.3.2 अभ्यास 2: जाणीवांची सजगता

मनातील जाणीवा सजग ठेवत निसर्गाशी नाते जोडणे. ही भूमिका झॅजोन (2009) या विचारप्रणालीतून घेतली आहे.

ऑस्ट्रीयन तत्त्वज्ञ आणि समाजसुधारक रूडॉल्फ स्टेनर यांनी, गटेच्या 'वर्ल्डव्ह्यू' या विचारसरणीचा आधार घेत असे सांगितले आहे की पूर्णपणे विषयासक्त राहून निसर्गाशी एकरूप व्हायला हवे. गटे म्हणतो: नेत्र किंवा कर्ण यापेक्षा विचारांचे इंद्रिय हे पूर्णपणे वेगळे असून, त्यात आपली समज वा दृष्टिकोन प्रगट होत असतो. डोळे आपल्याला रंगांची जाणीव करून देतात तर कान आवाजांची. तर विचारांमधून नवनव्या कल्पनांची जाणीव होते. त्यातूनच आपल्याला जमीन म्हणजे काय ते लक्षात येते. अनेकदा आपल्या जाणीवा या साचेबंद होऊन जातात. त्यातून यांत्रिक पद्धतीने जगाचा फक्त ऐहिक दृष्टिकोन समोर येतो. आवाज असो की रंग की कोणतीही हालचाल यातून त्यापलीकडल्या जाणीवा व्हायला हव्यात.

### या घटकांशी नाते कसे जोडायचे?

#### जमीन

एखादा दगड वा कवच म्हणजेच शिंपला शोधून काढा. सागरी पर्यावरणात शिंपला मिळणे काहीच कठीण नाही. त्याचे रंग, रूप, आकार, वजन, त्याची गुणवत्ता नीट न्याहाळा. तो उबदार भासतोय की थंड? त्याचा पोत कसा आहे ते बघा. डोळे बंद करा. बहुधा त्याच बाबींवर लक्ष केंद्रित होईल. मनाची नजर ही त्या शिंपल्याच्या रंग-रूपावरच केंद्रित झालेली असेल. मनातील या प्रतिमेवर घट्ट नजर खिळवा. पुन:प्रत्यय मिळवा. त्यासाठी आवश्यक तो वेळ द्या.

डोळे बंद ठेवून वा दुसरीकडे नजर लावून त्याच प्रतिमेचा विचार करा. त्यातून तुम्हाला त्या शिंपल्याची नंतरची प्रतिमा साकार होताना दिसेल वा पोकळी जाणवेल. संपूर्ण शांततेची अवघड सवय आणि तीही कोणत्याही अपेक्षेविना मन सजग असल्यामुळे सुरू होईल. ती पोकळी कायम ठेवण्याचा प्रयत्न करा. हा अभ्यास परत परत करा. लक्ष शिंपला आणि मोकळ्या जागेवर केंद्रित करा.



The shell leaves a trace behind, which we are able to sense as the lingering presence of the shell in the empty space before us or perhaps within us. Allow the inner presence of the shell to remain where it is, but then, with your eyes open, pour yourself a shallow bowl of water.

### Water

Water now becomes your object of contemplation. Observe it intently. Move the bowl slightly and notice the delicate movement of the water's surface. Notice how it conforms in shape to the vessel containing it. Observe that its surface is flat and parallel to the surface of the Earth—tip the glass, and the water's surface stays parallel to the ground. Swirl your finger in the water: it is clear, cool and wet. Observe how different it is from the shell: clear, compliant, mobile, wet and responsive. Detail the many properties of water that you can perceive directly. Avoid textbook facts or associations, but rely on your senses.

Again, having concentrated on the water, turn aside or close your eyes and sustain the empty space of silent open awareness. Allow the gesture or quality of water to arise fully in consciousness. Do not attempt to 'see' something. Instead simply allow your open awareness full play. What does water 'feel' like to you? Repeat the exercise until you are confident that you have found a deep feeling for the inner gesture of water.

Now juxtapose the shell and water in your interior space. Appreciate the differences between the inner gestures of the shell and water as they appear side by side. Since comparison can be a powerful experience and an important tool, give it time to develop. Be patient or repeat the exercise as often as necessary.

शिंपल्याशी जडलेले नाते मनात एक दुवा ठेऊन जाते. त्यातून कदाचित अंतर्मनात त्या शिंपल्याचेच अस्तित्व राहू शकते. मनातल्या त्या शिंपल्याचे अस्तित्व कायम ठेवत स्वत:ला एका छोट्या पात्रातील पाण्यात 'झोकून' द्या.

## जल

आता तुमच्या जाणीवांचे केंद्र हे जल वा पाणी आहे. त्या पात्रातील पाण्याचे सुक्ष्म निरीक्षण करा. ते पात्र हळूच हलवा आणि पाण्यावर उठणारे तरंग बघा. पात्राच्या आकाराशी ते कसे जुळवून घेतात ते बघा. पात्रातील पाण्याची पातळी ही जमिनीशी समांतर असेल, याची काळजी घ्या. पात्र तिरपे करा. पाण्याची पातळी जमिनीशी समांतरच राहते. हाताच्या बोटाने पाणी ढवळा. ते शांत, थंड तसेच ओलसर आहे. शिपल्यापेक्षा ते किती वेगळे आहे. तुम्हाला जाणवणारे पाण्याचे गुणधर्म शोधा. पाठ्यपुस्तकातील संकल्पनांपेक्षा वेगळा विचार करा. पण तुमच्या जाणीवांशी सलग्न राहा.

पाण्याशी लक्ष केंद्रित केल्यानंतर आता डोळे बंद करा वा दुसरीकडे नजर लावा आणि मनाची शांतता अनुभवा. आपल्या अंतर्मनात पाण्याचे गुणधर्म जाणा. मुद्दाम काही तरी 'बघण्याचा' प्रयत्न करू नका. पाणी तुम्हाला नेमक्या काय भावना जागृत करून देते? पाण्याच्या अंतर्मनात तुम्ही प्रवेश केला आहे, असे वाटेपर्यंत ही कृती पुन्हा करा.

आता तुमच्या अंतर्मनात शिंपला आणि पाणी समोरासमोर आणा. या दोन्हींमधील फरक जाणून घ्या. तुलना हा एक महत्त्वाचा अध्याय आणि साधनही आहे. संयम पाळा आणि हा अभ्यास पुन:पुन्हा करा.

## Air

To earth and water we can now add air. Since it is all around us, we do not need to take it from the ground or pour it into a bowl. Air is present around us and inside us. But it is mostly unobserved until a breeze stirs and we feel the wind on our cheek or see the fluttering of leaves, bending of grass, etc. Rhythmically observe the air and feel the omnipresent movement of air in the empty space. Even when the wind dies away, the air remains. Now place this experience beside that of water and earth. Observe the difference. Do not think; simply observe. Shell is not water, water is not air. Each has its own nature. Sense them each and their differences.

Studied in this way, the elements and colours form an alphabet of inner experience. We have been misled into seeing only the external aspects of things. Contemplation on sense objects shifts are attention to another aspect that is typically neglected: we break the chains of habitual consciousness and train our observation to sense the subtle gestures of everything around us. We are learning an interior language that will prove to be essential for our later stages of contemplative practice and experience. Every sense experience becomes an occasion for deep engagement and the rise of its inner correlate.



## हवा

आता जमीन आणि पाणी यांच्यासमवेत आपण हवेचा विचार करू शकतो. हवा ही आपल्या चोहोबाजूस असते. त्यामुळे ती हातात घेऊन एखाद्या पात्रात ठेवण्याची गरज नाही. हवा जशी आपल्या सभोवताली असते, तशीच ती आपल्या अंतर्मनातही असते. पण वाऱ्याची एखादी मंद झुळुक येईपर्यंत वा झाडांची पाने फडफडायला लागेपर्यंत आपल्या मनाला हवेचे अस्तित्व जाणवतही नाही. हवेच्या अस्तित्वाचा तालासुरात विचार करा आणि सभोवतालच्या पोकळीतील हवेचे सर्वव्यापी अस्तित्व जाणून घ्या. या अनुभवाचा पाणी आणि जमिनीबाबत आलेल्या अनुभवाशी संदर्भ जोडा. त्यातील फरक जाणून घ्या. विचार करू नका. फक्त लक्ष द्या. शिंपला म्हणजे पाणी नाही आणि पाणी म्हणजे हवा नाही. प्रत्येकाला स्वत:चा स्वभाव आणि स्वत:चे गुणधर्म आहेत. त्यांच्यातील फरक जाणून घ्या.

या अभ्यासपद्धतीमुळे आपल्याला या घटकांच्या बाह्य रूपापेक्षा त्यांचे अंतरंग जाणून घेण्यास मदत होईल. सुप्त मनात या घटकांचे दुलक्षित गुणधर्म जाणीवेच्या पातळीवर मनन करा. आपल्या सभोवताली जे काही आहे, त्यास चाकोरीपलीकडे जाणून घेण्याचा प्रयत्न करा



### Light (fire)

Earth, water and air do not exhaust nature's bounty. In turning away from the material world towards light, we find ourselves challenged to attend contemplatively to the insubstantial. We are constantly in light's presence but uncertain of its nature. It is at once illusive and essential not only to sight but to life as well. Plants, animals and humans would wither away without its nourishing energy. The contemplation on light is different from the one that encompassed the previous elements. Begin with light's absence. The experience of outer darkness prepares us for the dawn. The features of the landscape are connected to you through light. We are placed into relationships through light. Feel these qualities of light as you observe the light phenomena around you. Sense not just the luminous objects themselves but the light that is between you and everything that you see.

Appreciate the particulars of the relationship that light makes possible. Shift your attention increasingly away from the objects seen and toward that which works unseen between everything, gently and invisibly weaving disparate parts into a whole. Moreover, the brightness of light stimulates and uplifts us, while darkness draws us into silence that extends us into the unseen all around. Everyone can sense the difference between the inner presence of light and the presence of darkness. Discover this difference for yourself as you live your way into light inwardly. When you are filled with light, be silent. Sit with the after-image of the setting sun.

We have learnt how to become the cloud, rain, river and sea, going through all the transformations of water. But what is of import is not the water but the change. Keep your attention not on the medium but on the transformation it undergoes. We enter into the manifold forces and loving wisdom that unfold around us. We are in them, they are in us. We learn to enter into the life and death of nature, to know its coming into being and its passing away. Through this phase, we learn to be born with the sprouting corn and to die with the withering husks. The cycle of life is no longer a merely physical sequence but an unfolding interior drama of flourishing and failing, patterned on the endless reality of life and death in all realms: plant, animal and human.

## The ecological consciousness

Life carries meaning and purpose. Purposeless growth is profligate and cancerous. The tree must give fruit, the seeds must be formed. If we have worked our way stepwise to the flame of dying and becoming, if we have felt reverence before nature and committed ourselves to service, then the death of the husk, which is to say our lower self, is nothing fearsome. We are certain to uncover the real self thereby.

At the close of the contemplation, guide yourself back by recalling the full importance that awaits you here upon the good Earth. Contemplating in this way can help us form a true spiritual relationship with the Earth in a way many traditional societies and philosophers did. Arne Naess placed the experience of profound ecological interconnectedness at the heart of his philosophy of 'deep ecology' and recognized the spiritual foundations of ecological ethics. Satish Kumar called it 'reverence ecology.' Naess, Kumar and so many others rightly acknowledged that an ethics governing the relationship of humanity with the Earth cannot be the outcome of a rational cost-benefit analysis merely but must be predicated on a lived spiritual relationship to her. The above-mentioned approach and methods help us connect deeply with nature and cultivate ecological consciousness.

Closing ceremony- Gathering the minds

**प्रकाश (अग्नी)**

निसर्ग हा भलताच उदार आहे आणि त्याचे औदार्य हे जमीन, हवा आणि पाणी यापुरते मर्यादित नाही. अग्नीच आपल्याला प्रकाश देतो आणि तो आपल्या चोहोबाजूस पसरलेला असतो. मात्र, त्याचा 'स्वभाव' आपल्याला ठाऊक नसतो. केवळ दृश्यापुरती त्याची उपयुक्तता मर्यादित नसते तर अग्नीमुळेच आपले जीवन असते. त्यापासून मिळणाऱ्या ऊर्जेविना झाडे-झुडपे-वेलीच प्राणीमात्रही विनाश पावतील. यापूर्वी आपण बघितलेल्या मूलतत्त्वांपेक्षा अग्नीला जाणून घेणे, हे वेगळे आहे. तुम्ही प्रकाशाविना जगाचा विचार करून बघा. बाहेरचा अंधार हा आपल्याला प्रात:कालासाठी तयार करत असतो. केवळ प्रकाशामुळे निसर्गाची बाह्य रूपे आपण जाणून घेऊ शकतो. केवळ प्रकाशामुळेच आपली नाती जोडली जाऊ शकतात. आपल्या सभोवतालच्या प्रकाशाचा विचार करताना, हे घटक लक्षात घ्या. केवळ प्रकाशमान वस्तूंचाच विचार करू नका तर तुम्ही आणि तुम्ही जे काही बघत आहात, त्यामधील प्रकाशाचे संदर्भही लक्षात घ्या.

प्रकाशामुळे शक्य झालेल्या नात्यांचा विचार करा. केवळ ज्यांच्या ज्यांच्याशी तुमचे नाते जडले आहे, त्या विषयांचा विचार न करता, त्यापलीकडे जाऊन जे आजवर आपण नुसते 'बघत' आलो, त्याचा विचार करा. प्रकाशाचे तेज आपल्याला प्रेरणा देते, आपले उन्नयन करते. त्याउलट अंधार आपल्याला एका पोकळीत घेऊन जातो. अंतर्मनातील प्रकाश आणि अंधार यांच्यातील फरक आपण सारेच जाणतो. आपल्या अंतर्मनातील प्रकाशाच्या दिशेने प्रवास करताना या फरकावर लक्ष केंद्रित करा. तुमचे मन तेजाने भरून जाईल आणि तेव्हा सूर्यास्ताच्या वेळच्या प्रतिमांचे स्मरण करा.

नभ म्हणजेच ढग, पाऊस, नद्या आणि सागर ही सारी पाण्याचीच बदलातून आकार घेणारी विविध रूपे आहेत, हे आपण जाणतो. आपल्यासाठी पाणी महत्त्वाचे नाही तर बदल महत्त्वाचा आहे. आपले लक्ष विषयावर नव्हे तर त्यातून होणाऱ्या बदलावर केंद्रित करा. -आणि ज्ञानाचे एक मोठे भांडार आपल्यासाठी खुले होईल. हे सारे घटक आपल्यात आहेत आणि आपण त्यांच्यात आहे. जन्म आणि मृत्यू या संकल्पना आता हळूहळू लक्षात येतील. शेतात फुलणाऱ्या दाण्याबरोबर आपला जन्म होतो आणि त्याच बीजाच्या फोलपटाप्रमाणे आपला अस्त होतो. जीवनाचे हे चक्र म्हणजे केवळ जन्म-मरणाचा शारीरिक पातळीवरील खेळ नाही तर तो मानसिक पातळीवर फुललेले जीवन अस्ताला जाणे असा आहे आणि हा खेळ वनस्पतींपासून सर्व प्राणीमात्रांना लागू आहे.

## पर्यावरणविषयक जाणीव

जीवनाचा प्रवास हा कायमच अर्थवाही असतो आणि त्यात काही उद्दिष्टेही निश्चित केलेली असतात. झाडाने फळ दिलेच पाहिजे; अन्यथा बीज कोठून तयार होणार? आपण जर काही निश्चित ध्येय, उद्दिष्ट समोर ठेवून जीवन व्यतीत केलेले असेल तर नंतर फोलपटाप्रमाणे होणारा अंत हा भयावह असणार नाही. तोपावेतो आपल्याला आपलाच खरा शोध लागलेला असेल.

या अभ्यासप्रकाराच्या अखेरीस या पृथ्वीतलावरील आपल्या जीवनाचा खरा अर्थ जाणून घ्या. परंपरा जपणाऱ्या समाजाने तसेच अनेक तत्त्ववेत्त्यांनी वसुंधरेबरोबरचे आपले अध्यात्मिक नाते याच पद्धतीने जाणून घेतले आहे. अर्न नॅस या तत्त्ववेत्त्याने 'डीप इकॉलॉजी'च्या सिद्धांतातून हेच सांगितले आहे. त्यातूनच पर्यावरणविषयक नीतीशास्त्राला अध्यात्मिक बैठक प्राप्त झाली आहे. याच तत्त्वप्रणालीचा उल्लेख सतीश कुमार हे 'पर्यावरणाचा आदर' वा 'पर्यावरणाचा सन्मान' अशा शब्दांत करतात. या दोहोंबरोबरच इतरही अनेक तज्ज्ञांनी वारंवार नमूद केले आहे की माणसाच्या पृथ्वीशी असलेल्या नात्याचा विचार नफ्या-तोट्याच्या परिभाषेत करता येणार नाही. ते नाते अध्यात्मिक पातळीवरचे आणि कोणत्याही ऐहिक गोष्टींच्या पलीकडले आहे. एकदा ही भूमिका स्वीकारली की पर्यावरणविषयक सजगता अगदी सोपी होऊन जाते.

सांगता समारंभ: सर्वांच्या भावना जाणून घेणे

### 3.3.3 Exercise 3: Experiencing our emotional connect to nature in general and to the coast and marine life in particular

Students today are overwhelmed with a number of elements that dominate the social scenario, entertainment, gadgetry, etc. all of which focuses on the 'gratification' aspect of the young persons' psyche.

To make them appreciate nature, they first need to be sensitised about the beauty, complexity and the fine workings of Mother Nature. Like a ground or earth that must be prepared to accept new seeds, so must the students minds be prepared for this transition of a busy lifestyle to being more sensitive to Mother Nature. Using the term 'Nature' by itself isolates any personification of it. Once we insert the word 'Mother' as the one who creates, personifies the complex processes of this planet. Since our target audiences are 'humans' and every human should have come from a source his/her mother, the connection is made immediately with the use of the term 'Mother Nature'.  This also knocks on the emotional core of the target audience.



## 3.3.3 अभ्यास 3: निसर्गाशी आणि विशेषत: सागरी किनारपट्टीवरील भागाशी जडलेल्या भावनिक नात्याची अनुभूती

आजच्या जगात विद्यार्थीवर्ग हा करमणूकीच्या अनेक साधनांमध्ये गुंतून पडला आहे. इलेक्ट्रॉनिक गॅजेट्सचा त्याच्यावर मोठा प्रभाव आहे आणि हे सारे तो आनंद मिळवण्यासाठी करत असतो.

या वर्गाला निसर्गाचे भान आणून देण्यासाठी सर्वप्रथम त्यास निसर्गाचे सौंदर्य तसेच निसर्गातील अनेक गुंतागुंतीच्या प्रक्रिया लक्षात आणून देणे जरूरीचे आहे. या वर्गालाआपल्या 'बिझी' जीवनशैलीतून बाहेर पडून, निसर्गाचे भान आणून द्यायला हवे आणि त्यासाठी केवळ 'निसर्ग' अशा उल्लेख न करता 'मदर नेचर' असा तो केला की एकूणच या जगताच्या निर्मितीचा संदर्भ त्यामागे उभा राहतो. आपला लक्ष्य गट हा अर्थातच मानव असा आहे आणि प्रत्येक मानवाची उत्पत्ती ही तिच्या/त्याच्या आईपासून झालेली असते, हे लक्षात घेता 'मदर नेचर' या उल्लेखाने त्याचे/तिचे नाते निसर्गाशी झटकन जुळून जाते. त्याचबरोबर या उल्लेखामुळे लक्ष्यगटाची भावनिक तारही छेडली जाते.



## Uncluttering process:

Before disseminating any information that requires the students to absorb and contemplate on, a quiet session of meditation or uncluttering of the mind has proven successful. The instructor asks students to stay silent and only focus on their breathing, ideally to focus on the sound of air rushing out of their nostrils. Thi exercise of meditation immediately focuses the mind on the breathing and thus reducing the activity of other thoughts. This enables them to take off the baggage of a previous session or activity, thus making them open to new information also helping them retain that new information.

Emotional triggers of heart and mind are activated through viewing of the recommended film.
This film highlights the beauty of mother earth showcasing common and mostly rare species of sea creatures creates an experience of amazement in the students mind. This session is also like an escape for the mind. This keeps them attentive and invested since its new information they are getting. Young minds are always looking for something new. This gratification is somewhat fulfilled through this film. If the trainer expresses his/her viewpoint verbally while the film is playing, it will break the attention of the students and there will be a disconnect.  Once completing viewing the film the trainer will ask the class to stay silent and meditate on what they saw. This allows the absorption of the information to set in the students mind.

**Duration:** 30 minutes

**Material required:** Video/photo slide show, background music, envelopes to collect individual letters from students

Our objective is to allow the students to invest themselves in these concepts, which will later facilitate them in an action-oriented approach to the concepts presented to them. This being the most important session, it should be handled sensitively. If the students are not sensitized, then the following modules will have little impact on them. Sensitizing students will allow them to have an emotional attachment to the subject.

- Play photo slide with background music while students watch and listen, in complete silence and without any disturbance from mobile phones.

**Depending on the access to a coast, this session can also be organized as a coastal walk, followed by the reflection session in the classroom**

- Give the students time to reflect, share their emotional connect with nature with their neighbour and write down their ideas on paper to be submitted to the trainer.
- Have silence for a minute so that the students can process the information.
- Ask the students to write down their understanding of biodiversity. The students should write down their understanding of biodiversity, marine biodiversity in particular.
- Collect the written sheets. Read out a few answers.

## मनातील गोंधळ दूर करण्याची प्रक्रिया

विद्यार्थ्यांना कोणतीही नवी माहिती ग्रहण करण्यासाठी देण्यापूर्वी त्यांच्या मनातील नानाविध विचारांचा गोंधळ दूर करणे जरूरीचे आहे. त्यासाठी ध्यानधारणेचे एक सत्र उपयुक्त ठरू शकते. शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांना प्रथम काही काळ श्वासावर लक्ष केंद्रित करून शांत बसण्यास सागतो. खरे तर आपल्या उच्छवासावर लक्ष केंद्रित करणे अधिक इष्ट असते. त्यामुळे तत्काळ मनाचे लक्ष श्वासावर केंद्रित होते आणि अन्य विचारांना मनात थारा मिळत नाही. त्यामुळे या सत्राच्या आधी झालेल्या घडामोडींच्या मनातील विचारांपासून दूर जाण्यास मदत होते. त्यामुळे नवे विचार, नवी माहिती ग्रहण करण्यासाठी त्यांचे मन हे कोर्‍या पाटीसारखे स्वच्छ होऊन जाते.

संबंधित विषयाची एखादी फिल्म बघताना हृदय तसेच मनाच्या भावनिक तारा छेडल्या जातात. या फिल्ममध्ये निसर्गाच्या सौंदर्याबरोबरच सागर किनार्‍यावर नेहमी बघायला मिळणार्‍या तसेच दुर्मिळ प्रजाती पाहावयास मिळतात आणि विद्यार्थीवर्ग स्तिमित होऊन जातो. त्यामुळे त्यांचे लक्ष विषयावर केंद्रित होण्यास तर मदत होतेच; तसेच मिळणारी माहिती ते सहज ग्रहण करून जातात. आपले मन हे सतत नाविन्याचा शोध घेत असते. त्यामुळे ही नवी माहिती त्यांना आनंदही देऊन जाते. चित्रपट सुरू असतानाच प्रशिक्षक त्यांच्याशी संवाद साधत राहिला तर त्यांचे लक्ष चित्रपटापासून विचलित होईल. चित्रपट पूर्ण झाल्यावर प्रशिक्षकाने त्यांना काही काळ शांत बसून काय बघितले त्याचे मनन करायला सांगावे. त्यामुळे मिळालेली माहिती विद्यार्थ्यांच्या मनात खोलवर रुजून राहू शकते.

**कालावधी:** 30 मिनिटे

**साधने:** व्हीडिओ वा फोटो स्लाईड शो. पार्श्वसंगीत. प्रत्येक विद्यार्थ्याची वैयक्तिक मते जाणून घेण्यासाठी लिफाफे.

आपले उद्दिष्ट विद्यार्थ्यांना या साधनांमध्ये गुंतवून टाकण्याचे आहे. त्यातूनच त्यांना प्रत्यक्ष कृतीकडे जाता येऊ शकते. हे अतिशय महत्वाचे सत्र असून, त्यामुळे त्याचा विचार अत्यंत गांभीर्याने करायला हवा. या सत्रात विद्यार्थी प्रेरित झाले नाहीत तर पुढच्या सत्रांचा त्यांच्यावर फारसा परिणाम होणे कठीण असते. त्यामुळेच या सत्रात त्यांची भावनिक नाळ जुळणे आवश्यक आहे.

- पार्श्वसंगीतासह चित्रफीत वा स्लाईड शो सुरू करा. त्यांना कोणत्याही बाहय अडथळयांशिवाय म्हणजेच मोबाइल फोन वगेरे, शांतपणे ऐकू आणि बघू द्या.

**जर किनार्‍यावर जाणे सहज शक्य असेल तर 'कोस्टल वॉक'ने हे सत्र सुरू करून त्याचा शेवट वर्गखोलीत करा.**

- विद्यार्थ्यांना आपला प्रतिसाद देण्यासाठी पुरेसा वेळ द्या. त्यांच्या भावनांशी समरस व्हा. त्याच्या नोंदी ठेवा आणि नंतर त्या प्रशिक्षकाकडे सुपूर्द करा.
- आपल्या माहितीचा विचार करण्यासाठी त्यांना मिनिटभराचा वेळ द्या.
- जीववैविधतेविषयीचे आपले आकलन त्यांना नोंदवण्यास सांगा. विशेषत: सागरी किनारपट्टीवरच्या भागातील जीववैविधतेबाबतचे आकलन नोंदवणे अपेक्षित आहे.
- विद्यार्थ्यांची निरीक्षणे गोळा करा. काही उत्तरे वाचून दाखवा.





# 3.4 A bouquet of training methods for delivery of modules

Excellent trainers should have mastery over a wide variety of methods. They should also be agile, creative and flexible in handling a broad array of techniques.

| Methods | Tool | Material | Equipment |
|---|---|---|---|
| *How the content is going to covered/ delivered* | *The aids that are used in the course of training* | *The content that is shared with participants* | *The infrastructure which helps in utilizing aids* |
| Small group work | Posters | Handouts | Projector |
| Role play | Cards | Handbook | Laptop |
| Case study | Stickers | Readings | Speakers |
| Simulation | Charts | PPT | Mike |
| Interactive lecture | Markers | Film clips | Boards |

The following section describes a selection of methods that can be used for delivering specific topics in this course. For each module, some suggestions have been made about suitable methods; however, trainers are encouraged to experiment with new methods on the basis of their unique participants and their expectations from the course (see previous section about developing a baseline of expectations).

*Brainstorming.* This is the generation of many ideas by simply calling out. Every answer is included in the process. The trainer does not filter the responses or views from the participants in the first round. It is a good method to get everybody involved on some broader issues (to narrow down the scope of the session) and to stimulate some unconventional inputs from them (on issues that are complicated or have too many facets to be addressed in a regular discussion mode, e.g., participants' perception of climate change). The trainer writes responses on a flip chart or on coloured cards that are pinned on a soft board.

*Brain writing.* This is similar to brainstorming, but instead of one person writing what others shout out, each person writes his or her own ideas on cards. These can later be clustered on pin boards.



# 3.4 वेगवगळ्या प्रशिक्षण पद्धतींचा गुच्छ

कुशल प्रशिक्षक हा प्रशिक्षणाच्या वेगवेगळ्या पद्धतीत पारंगत असायला हवा. वेगवेगळ्या प्रशिक्षण पद्धतींशी जुळवून घेण्याइतका तो चपळ आणि सर्जनशील असायला हवाच; शिवाय नवनवे बदल स्वीकारायचीही त्याची तयारी हवी.

| पद्धत | साधने | साधन | यंत्रणा |
|---|---|---|---|
| *आशय कोणत्या पद्धतीने पोचवायचा?* | *प्रशिक्षणसत्रात वापरावयाची साधने* | *सहभागींबरोबर 'शेअर' करावयाचा प्रकार* | ***सत्राचे इन्फ्रास्ट्रक्चर*** |
| छोट्या गटांतील काम | पोस्टर्स | हॅण्डआऊट | प्रोजेक्टर |
| रोल प्ले | कार्ड्स | हॅण्डबुक | लॅपटॉप |
| केसस्टडी | स्टीकर्स | वाचन | स्पीकर्स |
| नक्कल | चार्ट्स | पीपीटी | माईक |
| संवादी भाषण | मार्कर्स | चित्रफिती | बोर्ड्स |

सत्राच्या ओघात येणाऱ्या वेगवेगळ्या विषयांसाठी नेमक्या कोणत्या पद्धतीची निवड करावी ते आपण आता बघणार आहोत. प्रत्येक मॉड्युलसाठी नेमकी कोणती पद्धत योग्य याबाबत अनेक सूचना येऊ शकतात. पण आपल्या सत्राचे विशिष्ट विद्यार्थी आणि त्यांच्या अपेक्षा लक्षात घेऊन प्रशिक्षकांना नवनव्या पद्धतींचा वापर करण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. (प्रशिक्षणार्थींच्या किमान अपेक्षांसंबंधातील आधीचा विभाग बघा.)

*ब्रेनस्टॉर्मिंग:* यातून अनेक नवनव्या कल्पना पुढे येऊ शकतात आणि त्याच प्रक्रियेतून अनेक प्रश्नांची उत्तरेही सामोरी येतात. पहिल्या फेरीत प्रशिक्षक विद्यार्थ्यांच्या कोणत्याही मताला चाळणी लावणार नाही. अनेक परिघे असलेल्या विषयांमध्ये सर्वांना गुंतवून टाकण्यासाठी ही पद्धत उपयुक्त ठरते. त्यामुळे काही अगदीच अपारंपरिक असे मुद्देही उपस्थित होऊ शकतात. उदा.: वातावरणातील बदल (क्लायमेट चेंज). या विषयासंबंधातील प्रशिक्षणार्थींची मते समज आधीच कळू शकते. प्रशिक्षक त्यावेळी ही मते वेगवेगळ्या कार्डांवर नोंदवून घेईल.

*ब्रेन रायटिंग:* एकानेच सर्वांची मते वा मुद्दे लिहून घेण्याऐवजी या पद्धतीत प्रत्येक जण आपापली मते वा मुद्दे कार्डांवर लिहीत जाईल. नंतर ती पीन बोर्डावर लावता येतील.



## Brainstorming and brain writing

There are two types of human 'thinking', which were described by early psychologists as 'convergent' and 'divergent' intelligence. Convergent thinkers are generally encountered in technical professions and in the field of administration: they prefer to go from A to B and conclude at C, their thinking processes are linear, and they like to optimize existing models and prototypes. Divergent thinkers are more often found in the realm of the arts: they are inclusive and nonlinear, and their thinking seems to 'jump around.'

In order to work on complex developments (for example in coastal tourism and its impacts on coastal ecosystems), it is important that divergent and convergent thinkers work effectively and efficiently together. This is often a challenge for trainers with heterogeneous audiences. A group that intends to go beyond its established frame of solutions (i.e., is prepared to leave the comfort zone and to learn to think out of the box) may wish to use the brainstorming or brain-writing technique. The important feature of these two techniques is that everybody agrees (and the facilitator may reemphasize this at the beginning of the session) that in the first step everything,—really everything—is allowed to be said and written down, even if it looks 'strange' or 'incorrect' or is not immediately apparently a solution. This is referred to as 'taking the nonconstrained view.'

It is only in a second round that the many ideas are clustered, discussed and evaluated—and it may transpire that an idea which initially looked crazy (like sailing west to go east) turns out to be the best solution to the problem.

## ब्रेन स्टॉर्मिंग आणि ब्रेन रायटिंग

माणूस नेहमी दोन प्रकारांनी विचार करतो. पूर्वीच्या मानसशास्त्रांज्ञांनी या प्रकारांचे केंद्रीभूत आणि विकेन्द्रीभूत अशा संज्ञा दिल्या आहेत. केंद्रीभूत पद्धतीने विचार करणारे हे तांत्रिक वा प्रशासकीय क्षेत्रांत बघावयास मिळतात. ते नेहमी अ पासून ब कडे जातात आणि क हा त्यांचा निष्कर्ष वा अनुमान असते. विकेन्द्रीभूत पद्धतीने विचार करणारे बहुधा कलेच्या क्षेत्रात असतात आणि ते सर्वसमावेशक तसेच एकाच दिशेने विचार न करणारे असतात. त्यांचे विचार हे कायम या मुद्यावरून त्या मुद्यावर उडी घेत असतात.

बहुआयामी विकासाच्या प्रश्नावर, उदा.: सागरी पर्यटन आणि किनारपट्टीवरच्या पर्यावरणावर होणारा त्याचा परिणाम, काम करत असताना या दोन्ही विचार पद्धती एकत्रितपणे काम करत असतात आणि त्याचा फायदाच होऊ शकतो. संमिश्र अशा गटाबरोबर काम करताना प्रशिक्षकासाठी हे आव्हान असते. साचेबंद उत्तरांच्या पलीकडे जाऊन विचार करणारा एक गट ब्रेनस्टॉर्मिंग तसेच ब्रेनरायटिंग या दोहोंचा वापर करू इच्छेल. पण या दोन तंत्रांचा वापर केल्यास प्रशिक्षणार्थींमध्ये एकमत होऊ शकते आणि समन्वयक तसे आधी सांगूही शकतो. पहिल्या प्रकारात सर्व काही म्हणजे सर्व काही सांगायला परवानगी असते आणि ते अपरिचित वा चुकीचे वाटले आणि तो मार्ग बरोबरचा वाटत नसला तरी लिहूनही घेतले जाते. यास मनमोकळे मतप्रदर्शन असे म्हणता येईल.

दुसऱ्या फेरीत मात्र अनेक मुद्यांना चाळणी लावली जाते. त्यावर चर्चा होते आणि त्यांचे मुल्यांकनही होते. त्यातून प्रारंभी अगदीच विचित्र वाटणारी कल्पना, उदा.: पूर्वेकडे जायचे असेल तर पश्चिमेच्या दिशेने प्रवास सुरू करा, ही प्रश्नावरचा सर्वोत्तम तोडगा ठरू शकते.

Brainstorming (where every idea is written in a callout list by a moderator) and brain writing (where every idea is written by the participants on cards that are subsequently arranged on pin boards) have become key techniques for developing new ideas within heterogeneous groups. So how can we use brainstorming in the learning environment?

1. Simply visualize the question to be addressed (e.g., ‘What shall we do tomorrow evening?’)
2. Introduce the brainstorm rule: ‘Everything is OK! No commenting on other people’s ideas in the initial round’.
3. Let them storm.
4. Write the callout list on a flip chart.
5. Moderate the subsequent discussion according to the principles outlined in the chapter Dynamic Visualization.






